MAHMARI 19358/13/1/2000 - TC


विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष बाविसावे / अंक २ / फेब्रुवारी २०२१

## भावपूर्ण श्रद्धांजली!



**कै. श्री. माधव यशवंत गोखले**

(जन्म : ३०.१२.१९३१ मृत्यू : २८.१२.२०२०)

विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त व कार्यकारिणीचे ज्येष्ठ सदस्य श्री. माधव यशवंत गोखले यांचे सोमवार दि. २८.१२.२०२० रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी वार्धक्यामुळे निधन झाले. कै. श्री. मा. य. गोखले यांच्या कुटुंबीयांस झालेल्या दुःखात विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त, कार्यकारिणी सदस्य व सर्वसाधारण सदस्य, तसेच मंडळाच्या शाळा व महाविद्यालयांचे प्रमुख व सर्व कर्मचारी सहभागी आहोत. कै. श्री. मा. य. गोखले यांच्या कुटुंबीयांवर झालेला हा आघात सहन करण्याची परमेश्वर त्यांस शक्ती देवो.

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून...)

आजच्या कार्यकारिणी सभेमध्ये कै. श्री. माधव गोखले यांच्या दुःखद निधनाची नोंद घेण्यात आली. तसेच मंडळाचे विश्वस्त व कार्याध्यक्ष डॉ. विजय वा. बेडेकर यांनी कै. श्री. मा. य. गोखले यांच्याबाबतीत आपले मनोगत व्यक्त केले की, कै. श्री. मा. य. गोखले यांचा विद्या प्रसारक मंडळ परिवारात सन १९९२ साली मंडळाचे सर्वसाधारण सभासद म्हणून प्रवेश झाला. पुढे १९९४ साली मंडळाचे कार्यकारिणी सदस्य म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली व सन १९९९ ते सन २०१९ पर्यंत त्यांनी मंडळाचे कोषाध्यक्ष म्हणून धुरा सांभाळली. तसेच ऑगस्ट २०१४ पासून त्यांची विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त म्हणून निवड करण्यात आली. विद्या प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक संस्थांचे विविध शैक्षणिक उपक्रम, सभा, सांस्कृतिक कार्यक्रम इ. मध्ये त्यांचा उत्स्फूर्त सहभाग असायचा. शिवाय ठाण्यातील प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचे संस्थापक सदस्य होते व संस्थेच्या कार्यातही त्यांचे सहकार्य लाभले.

मंडळाचे सहकार्यवाह श्री. अुत्तम भा. जोशी यांनीही त्यांचे मनोगत व्यक्त केले. कै. श्री. मा. य. गोखले यांनी त्यांचा स्वतःचा बांधकाम व्यवसाय तसेच ठाण्यातील श्री कोपीनेश्वर मंदिराची सांस्कृतिक जबाबदारी सांभाळत मराठी ग्रंथ संग्रहालय, प्राच्यविद्या अभ्यास संस्था इ. च्या माध्यमातून आपले महत्त्वपूर्ण असे योगदान दिले आहे. सन १९९८ पासून म्हणजे सुमारे २२ वर्षे ते ठाणे भारत सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. कै. श्री. मा. य. गोखले यांच्या ठाणे भारत सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत अुत्तम भा. जोशी यांनी बँकेचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असताना घडलेल्या विविध घटनांचा व कै. श्री. मा. य. गोखले यांच्या विविध पैलूंचा उलगडा केला.

मंडळाच्या कार्यकारिणी सदस्य सौ. अल्पना अ. बापट यांनीही आपले विचार सभेपुढे मांडले. कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या निधनानंतर सन २००५ पासून सत्कर्म प्रतिष्ठान संस्था या सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा कै. श्री. मा. य. गोखले यांनी उत्तमरित्या सांभाळली व या संस्थेच्या माध्यमातून अनेक गरजू गुणवंत विद्यार्थी, तसेच गरजू रुग्णांना सेवा पुरवून सामाजिक कार्यातही आपला सहभाग नोंदवला. तसेच सन २००५ सालापासून विद्या प्रसारक मंडळ आयोजित श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठन स्पर्धेमध्ये प्रत्येक वर्षी प्रत्यक्ष हजर राहून त्यांनी अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले.

त्यांच्या जाण्याने विद्या प्रसारक मंडळाच्या कुटुंबात एक पोकळी निर्माण झाली आहे. परमेश्वर कै. श्री. गोखले यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना!

**– डॉ. विजय बेडेकर**

कार्याध्यक्ष

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

वि. प्र. मं. कार्यकारिणी सभा क्र.२

(२०२०-२१)

ठराव क्रमाक : (०१)

दिनांक २७.०१.२०२१

•••

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

वर्ष बाविसावे/अंक २/फेब्रुवारी २०२१

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २५ वे/अंक ८ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | २ |
| २) | श्री. माधव यशवंत गोखले यांचा जीवन वृत्तांत | श्री. अुत्तम भा. जोशी | ३ |
| ३) | श्री. मा. य. गोखले यांना आदरांजली | सौ. सुमेधा वि. बेडेकर | ५ |
| ४) | य एष सुप्तेषु जागर्ति | डॉ. सुचित्रा नाईक | ६ |
| ५) | सत्येंद्रनाथ बोस : पुंज भौतिकीचे जनक | श्री. नरेंद्र गोळे | ८ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | १६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## संपादकीय

# जागतिक रेडिओ दिवस

दरवर्षी १३ फेब्रुवारी हा दिवस जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा केला जातो. २०११ मध्ये युनेस्कोच्या सदस्य देशांनी जागतिक स्तरावर रेडिओसाठी एक दिवस राखून ठेवावा असे सुचविले. १३ फेब्रुवारी १९४६ रोजी युनेस्कोचे रेडिओ प्रसारण सुरू झाले होते. तिच तारीख जागतिक दिनासाठी घ्यावी असे या समितीने सुचवले होते. युनेस्कोच्या २०१२ मध्ये झालेल्या सर्वसाधारण सभेत ही सूचना मान्य करण्यात आली. तेव्हापासून १३ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा केला जातो. नवे जग, नवा रेडिओ हे यावर्षीच्या जागतिक दिनाचे घोषवाक्य आहे.

भारतीय भौतिकशास्त्रज्ञ जगदीश चंद्र बोस यांनी १८९५ मध्ये लंडनच्या रॉयल सोसायटीत दिलेल्या व्याख्यानात 'रेडिओ लहरींचा वापर करून ध्वनीप्रसारण करणे शक्य आहे' हा विचार मांडला. इटालियन तंत्रज्ञ गुगलिएल्मो मार्कोनी (Guiglielmo Marconi) याने या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचा विडा उचलला. १९०१ मध्ये त्याने अटलांटिक महासागराच्या एका किनाऱ्यावरून दुसऱ्या किनाऱ्यावर संदेश पाठविण्यात यश मिळविले. त्यासाठी मार्कोनी याला १९०९ चे भौतिक शास्त्राचे नोबेल पारितोषिक विभागून देण्यात आले. रेडिओ संदेशवहनाला विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात सुरुवात झाली. सुरुवातीच्या काळात खाजगी यंत्रणा आणि लष्कर यांच्यापुरताच रेडिओचा वापर होत असे. सर्वसामान्य माणसासाठी रेडिओ कार्यक्रम सुरू व्हायला बराच कालावधी जावा लागला. १९२० साली ब्रिटिश ब्रॉडकॉस्टिंग कंपनीची (British Broadcasting Company) स्थापना इंग्लंडमध्ये झाली. लगेचच दोन वर्षांनंतर म्हणजे १९२२ मध्ये मुंबई आणि कलकत्त्यात रेडिओ प्रसारण सुरू झाले. १९३६ साली ब्रिटिश सरकारने भारतभर प्रसारण सुरू करून त्याचे नाव ऑल इंडिया रेडिओ (All India Radio) असे ठेवले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रेडिओ प्रसारणाला 'आकाशवाणी' असे समर्पक नाव देण्यात आले. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे त्यांचे ब्रीद वाक्य आहे. आजच्या घडीला भारताच्या सगळ्या राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात रेडिओ केंद्र कार्यरत आहेत. इंग्रजी, हिंदी याबरोबरच अनेक प्रादेशिक भाषांमधून या केंद्रातून प्रसारण होत असते. देशाच्या कानाकोपऱ्यात रेडिओचे संदेश पोहोचले आहेत. रेडिओ प्रसारणाचे हे जगातील सर्वात मोठे जाळे आहे.

रेडिओ संचात झालेले अनेक बदल आपण पाहिले आहेत. जुन्या काळी मोठ्या आकाराचे वाल्व रेडिओ (Valve Radio) असत. चालू केले की त्यातून आवाज यायला काही वेळ लागायचा. त्यानंतर ट्रॅन्झिस्टरचा शोध लागल्यावर रेडिओ संचाचा आकार लहान झाला. या छोटेखानी रेडिओ संचाला ट्रॅन्झिस्टर (Transister) असेच म्हटले जात असे. कालांतराने स्वयंचलित वाहनात बसविण्यासाठी विविध आकारांचे रेडिओ संच बनविण्यात आले. अलीकडे तर रेडिओचे प्रसारण ऐकण्यासाठी रेडिओ संच घेण्याची गरजच राहिलेली नाही. आपल्या मोबाईल फोनवर आता आपण रेडिओचे कार्यक्रम सहज ऐकू शकतो.

रेडिओच्या शोधाने ज्ञानदानात क्रांती घडून आली. त्याआधी ज्ञानदानाचे दोनच मार्ग उपलब्ध होते. एकतर प्रत्यक्ष संपर्क किंवा पुस्तके. या दोन्ही बाबींना मर्यादा होत्या. पहिल्या प्रकारात शिक्षक आणि विद्यार्थी यांनी एकत्र येणे आवश्यक होते. पुस्तक वाचून ज्ञान मिळवायचे असेल तर साक्षरता ही मूळ अट होती. रेडिओच्या आगमनाने या सर्व समस्यांवर मात केली. रेडिओ लहरी


(मलपृष्ठ क्र.३ वर)

# श्री. माधव यशवंत गोखले यांचा जीवन वृत्तांत

*ठाण्यातील विविध संस्थांवर अनेक वर्षे कार्यरत असलेल्या श्री. मा. य. गोखले यांच्या जीवनाचा थोडक्यात आढावा या लेखात घेतला आहे - संपादक*

ठाणे भारत सहकारी बँकेचे संस्थापक संचालक, उपाध्यक्ष आणि अध्यक्ष कै. श्री. माधव यशवंत गोखले (मा. य. गोखले) यांचे दिनांक २८.१२.२०२० रोजी वयाच्या ८९व्या वर्षी वृद्धापकाळामुळे दुःखद निधन झाले. १९९८ सालापासून गेली २२ वर्षे ते अध्यक्ष म्हणून कार्यरत होते.

कर्नाटकातील मु. कुंदगोळ, ता. धारवड येथून सुमारे १९५४-५५ चया सुमारास ते ठाण्यात वास्तव्यास आले. काही वर्षे ऑडिटर जनरल या शासकीय कार्यालयामध्ये अधिकारी म्हणून ते कार्यरत होते. त्यानंतर त्यांनी ठाण्यामध्ये बांधकाम व्यवसायात पदार्पण केले. काही वर्षातच ते कुशल बांधकाम व्यवसायिक म्हणून नावारुपास आले. त्यांनी ठाणे-डोंबिवली-पुणे या ठिकाणी इमारतींचे बांधकाम केले आहे.



माननीय मा. य. गोखले साहेब ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळाचे गेली अनेक वर्षे संचालक सदस्य, तसेच ठाण्यातील इतर संस्थांच्या विविध पदांवर काम केले आहे. त्यांनी देशात-विदेशात अनेक शैक्षणिक सहली व परिषदांमधून भाग घेतला होता. त्यांना इतिहास, साहित्य, संस्कृति, कला, वास्तुशास्त्र, छायाचित्रण, चित्रकला व संगणक शास्त्र इत्यादींमध्ये त्यांना विशेष रस होता.

सुरुवातीपासूनच बँकेच्या जडणघडणीत श्री. मा. य. गोखले यांचा सिंहाचा वाटा होता. गेल्या २२ वर्षात बँकेत येऊ घातलेल्या नवनवीन कार्यप्रणालीत, संगणक, इंटरनेट, मोबाईल बँकिंग इत्यादी सोई-सुविधांनी सज्ज करण्याचा त्यांचा मानस होता. त्याप्रमाणे संचालक मंडळातील त्यांचे सहकारी व अधिकारी वर्गाच्या विचाराने वरील सर्व सोयी-सुविधा बँकेत कार्यरत करण्याचा विडाच उचलून जणू त्यांनी ते कार्य पूर्ण केले.

बँकेच्या विस्तारासाठी त्यांनी आपले संचालक मंडळातील सहकारी आणि अधिकारी वर्ग यांच्याबरोबर सततच्या बैठकी घेऊन बँकेला शेडचूल्ड दर्जा मिळविण्यासाठी व बँकेच्या शाखा वाढविणे आणि बँकेचे अंतर्गत विभाग स्थापून त्या विभागांची कार्यपद्धत पारदर्शक पद्धतीने करण्याचा हेतू साध्य केलेला आहे. बँकेच्या शाखा व अंतर्गत विभागातील बँकेच्या ग्राहकांना देण्यात येणारी सेवा ही त्वरित आणि तत्पर राहण्यासाठी प्रयत्न केला आहे. आजमितीस बँकेच्या एकूण ३०

शाखा असून एकत्रित व्यवसाय रु.२२५० कोटी इतका आहे.

सुरुवातीला ठाण्यातील नौपाडा विभागातील विष्णूनगर येथे तळागाळाच्या समाजातील लोकांना त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने भारत सहकारी बँकेची स्थापना करण्याचा विचार डॉ. वा. ना. बेडेकर, श्री. मा. य. गोखले व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनात आला. त्यानुसार १९७८ साली बँकेची स्थापना झाली. बँकेचे बोधचिन्ह म्हणून त्यांनी वडाच्या झाडाची प्रतिमा घेऊन "**अर्थोहि लोके पुरुषस्य बंधुः**" हे ब्रिदवाक्य यशस्वीरित्या पूर्ण केले.

गोखले साहेब गेली ४२ वर्षे बँकेच्या संचालक मंडळावर होते. बँकेचे स्वतःचे असे भारत भवन उभारण्याचे स्वप्न त्यांनी ह्रदयी बाळगले होते. त्यांचे हे स्वप्न त्यांच्या निधनापूर्वी काही महिने अगोदर बँकेच्या ऋतूपार्क या शाखेची इमारत बँकेच्या नावे खरेदी करून त्याचे नामकरण 'भारत भवन' असे केले आणि छोटेखानी स्वरूपात स्वप्न पूर्ण करून त्यांनी अखेरचा निरोप घेतला. मात्र बँकेच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्यामध्ये उपस्थित राहण्याचे त्यांचे स्वप्न अधुरे राहिले.

गोखले साहेब यांनी वयाच्या ६०व्या वर्षानंतर कायद्यातील पदवी आणि पदव्युत्तर परीक्षा दिली आणि उत्तीर्ण झाले. अत्यंत मनमिळावू स्वभावाचे असलेले गोखले साहेब प्रसंगानुसार कठोर निर्णयही घेत असत. कोणत्याही बाबतीत निर्णय घेताना कायदा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊनच ते निर्णय घेत असत.

तसेच, कोकण नागरी सहकारी बँक्स असोसिएशन मर्यादित, कल्याण ही संस्था कोकण विभागातील नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली आहे. या संस्थेच्या स्थापनेपासूनच संस्थापक, संचालकांच्या बरोबर श्री. मा. य. गोखले साहेब यांचे महत्त्वाचे योगदान होते. तसेच या संस्थेच्या कोकण विभागामध्ये होणाऱ्या सभांना सुद्धा आवर्जून उपस्थित राहून मार्गदर्शन करीत होते.

त्याचप्रमाणे ठाणे भारत सहकारी बँकेच्या माध्यमातून देशातील सहकारी बँका आणि पतसंस्थांची शिखर संस्था (नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप. बँक्स अॅण्ड क्रेडिट सोसायटी लिमिटेड) (NAFCUB) नवी दिल्ली, या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभांना आवर्जून उपस्थित राहत असत. देशातील नागरी सहकारी बँका व पतपेढी यांच्या कामकाजामध्ये आणि त्या संस्थांच्या उत्तरोत्तर प्रगतिसाठी आमूलाग्र बदल करण्याच्या मानसिकतेतून दोन वेळा संचालक पदासाठी निवडणूक देखील लढविली होती.

ठाण्याच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात एक अग्रणी व चतुरस्र व्यक्तिमत्त्व म्हणून प्रसिद्ध होते. त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता, चैत्यन्यशील वृत्ती, शिस्तबद्ध कार्यपद्धती असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेले गोखले साहेब यांचे 'पाऊले चालती : एक जीवनानुभव' या त्यांच्या आत्मकथनाची पहिली आवृत्ती प्रकाशित करण्याचे भाग्य ठाण्यातील व्यास क्रिएशनला मिळाले आहे. त्यांनी बँकिंग आणि अर्थविषयक क्षेत्रातील समृद्ध अनुभव आणि लेखन केले आहे. तसेच त्यांना "ठाणे भूषण" या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

तसेच त्यांना योगासनांची फार आवड होती. प्रशिक्षित योग शिक्षक म्हणून देखील त्यांनी भूमिका बजावली आहे.

ठाण्यामध्ये गेली १८ वर्षे सुरू असलेल्या श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यासाचे संस्थापक अध्यक्ष होते.

(पृष्ठ क्र. ७ वर)

माणसाने आपल्या आयुष्यात सुख-दुःख, मान-अपमान, स्फूर्ती-निंदा, लाभ हानी,

# श्री. मा. य. गोखले यांना आदरांजली

*श्री. मा. य. गोखले यांच्या आठवणी या लेखात जागृत करण्यात आल्या आहेत - संपादक*

उत्साही व सतत नावीन्याचा अभ्यास करण्याची आवड आणि निरीक्षणवृत्ती व अंतिम निर्णय हा 'सुवर्णमध्य' असावा ही भावना जोपासणारे मा. य. गोखले यांच प्रसन्न व्यक्तिमत्त्व.

विद्या प्रसारक मंडळ, प्राच्यविद्या अभ्यास संस्था, मराठी ग्रंथसंग्रहालय आणि श्री कोपिनेश्वर सांस्कृतिक न्यास अशा विविध उद्देशाच्या संस्थांवर कार्यरत असणारे, अध्यक्षपद भूषविणारे गोखले यांचा जीवनप्रवास हा त्यांनी केलेल्या संस्थांच्या नुसत्या नावावरून कळेल. अमेरिका व ऑस्ट्रेलियात आमच्या बरोबर परदेश प्रवास करणारे आणि थेट वेळणेश्वरला महर्षी परशुराम अभियांत्रिकी कॉलेजला जाऊन व्यक्त होणारे, सहजच मोठ्या आवाजात व्यक्त होताना, स्मित-हास्य करतानाचे उत्साही व्यक्तिमत्त्व डोळ्यांसमोर येते. तेच गोखले वेळणेश्वरच्या मंदिरात शंकराची पूजा करतानाही डोळ्यांसमोर येतात.

''सुमेधा कशी आहेस? आदर्श सून, आदर्श पत्नी...'' जेव्हा म्हटलं तेव्हा मला माझे सासरे वा. ना. बेडेकर आठवले. मी व बाबा (सासरे) त्यांच्याकडे गप्पा मारायला गेलो होतो.

पूर्वी सगळ्या व्ही.पी.एम्स्.च्या, बँकेच्या, म्युझियमच्या, प्राच्यविद्या अभ्यास संस्थांच्या मीटिंग बेडेकरांच्या घरीच व्हायच्या. ते म्हणायचे, ''बेडेकरांचे जसं प्रसुतीगृह आहे तसेच अनेक संस्थांना बेडेकरांनी जन्म दिलाय''. मुख्य म्हणजे आमच्या घरात सर्व पिढ्यांशी अगदी कामाकाजापासून ते घरातील कार्यक्रमांपर्यंत, परदेश प्रवासापासून अगदी आम्हाला लग्नाकार्यांतून 'पगड्या' प्रदान करेपर्यंतची दृष्टी, आवड, स्नेह व वेळोवेळी पाठीशी ऊभे रहाणारे माय गोखले हे अनेक जणांचे मदतनीस ठरले.

त्यांनी स्वतःच आत्मचरित्र लिहिलं. स्वतःच आत्मचरित्र लिहिणं सोपी गोष्ट नक्कीच नाही. पण त्यांनी अगदी जशी काही दैनंदिनी लिहावी इतक्या सहजपणे लिहिल्याचे जाणवते. मुख्य म्हणजे ठरावीक वयानंतर अनेक गोष्टी लक्षात रहाणे सोपं नाही. याचं कारण त्यांचा स्वभाव, निरीक्षणवृत्ती व उत्साह. जेव्हा डॉ. विजय बेडेकर 'अपक्ष' उमेदवार म्हणून विधानसभेच्या निवडणुकीसाठी उभे होते, तेव्हा श्री. रिबेरो, श्रीमती दुर्गाताई भागवत, श्री. तिनईकर यांचे बरोबर श्री. गोखलेही असायचे.

बेडेकरांच्या घरचं वातावरण, अगदी घरच्या तिन्ही पिढ्यांच्या मंडळींपासून ते विविध क्षेत्रातील मंडळींचे स्वभावदर्शन इथे मला घर बसल्या घडत असे. प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या अनेक प्रांतांच्या सहलीपासून, बँकेच्या उद्घाटनाच्या वेळेस व्ही. एन. दांडेकर आमच्या घरी आले होते. अशा अनेक गोष्टींचा 'श्रीगणेशा' या शिव-शक्तीत आमच्या घरी झाला. त्यामुळे चि. महेश, चि. आनंद यांना अमेरिकेतील प्रवासांत बॅगवर बसवून खेळवण्यापासून ते त्यांच्या घरी शेवटच्या काही काळात वॉकर चालवणारे गोखले तितकेच, उत्साही, आनंदी, व्यवस्थित बोलणारे, चौकशी करणारे, मुख्य म्हणजे आनंदी व समाधानी असेच लक्षात रहातात. अशा अनेक अनेक आठवणी आहेत.

अतिशय थोडक्यात, 'आठवणींची उजळणी' करण्याचा व मोठ्यांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी असतात तेव्हा कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न.

कै. गोखले यांच्या स्मृतीस सादर नमस्कार.

**- सौ. सुमेधा वि. बेडेकर**

# य एष सुप्तेषु जागर्ति

*दि. १६ जानेवारी २०२१ रोजी जोशी-बेडेकर महाविद्यालयात 'Recent Trends in Accounting Taxation, Finance & Auditing' या विषयावर पार पडलेल्या एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेतील डॉ. सुचित्रा नाईक यांच्या भाषणाचा अंश - संपादक*

अखिल भारतीय लेखापाल संस्थेने कठोपनिषदामधील एका मंत्राच्या अंशाचा वापर मोठ्या जागरूकतेने आपल्या बोधचिन्हामध्ये केला आहे. थोडक्यात, संस्थेचे बोधवाक्य आहे -

''य एष सुप्तेषु जागर्ति''

ज्यावेळेस सामान्य जन निद्रिस्त असतात तेव्हा योगी जागृत असतो व तो पूर्ण मंत्र असा आहे -

य एष सुप्तेषु जागर्ति कामं कामं पुरुषो निर्मिमाणः।
तदेव शुक्रं तद्ब्रह्म तदेवामृतमुच्यते।
तस्मिँल्लोकाः श्रिताः सर्वे तदु नात्येति कश्चन ।
एतद्वै तत् ।।८।।

दोन पंख उभारून अत्यंत तीक्ष्ण नजरेने भोवताल न्याहाळणारा गरुड व त्या खालील हे बोधवाक्य खूप काही सांगणारे आहे. किंबहुना लेखापालांनी कसे असावे याचा / तिचा काय आदर्श असावा याचा वस्तुपाठ म्हणजे हे बोधचिन्ह. Accounting करताना जमा-खर्च मांडताना, तपासताना अत्यंत बारकाईने निरिक्षण करून गरुडाप्रमाणे लेखापालाने प्रामुख्याने संस्थेच्या निधीचे निरिक्षण, रक्षण व संवर्धन करणे आवश्यक आहे, हा त्यातील संदेश. Accounting म्हटले तर ही आकड्यांची भाषा आहे. शब्दांच्या माध्यमातून एकवेळ आपण भूलभूलय्या निर्माण करू शकतो. सत्य विपरित मांडू शकतो. पण आकडे नेहमीच सत्य बोलतात. तसेच ह्या आकड्यांची मदत घेऊन मांडलेले Accounts तसेच सत्य परखड असावेत ही अपेक्षा.

मूलतः योगी जनांचा, संयमीचा अथवा मुमुक्षुंचा वर्तनव्यवहार मांडणारा हा श्लोक. मोठ्या खुबीने इथे त्यातील अर्धश्लोकाचा वापर केला आहे. भगवद्गीता ही उपनिषदांचे नवनीत असल्याने, गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील - सांख्ययोगातील स्थितप्रज्ञाचे वर्णन करतानाही जवळ जवळ अशाच अर्थाचा श्लोक येतो.

''या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्या जागृति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः

पुन्हा लेखापालनाला हा श्लोक लावून पाहिल्यास असाच अर्थ होतो की, जर का लेखापालन काटेकोर, सलग वस्तुनिष्ठ जाणते आणि द्रष्टे असेल तर सामाजिक व्यवहारातील अनेक अनर्थ टळू शकतात. वरवर दिसणारी 'All is well' परिस्थिती लेखापालाच्या चाणाक्ष नजरेला सुप्त धोके जाणूवन देऊ शकते. अनेकदा देत असते. त्यामुळेच परिक्षणाच्या थोडं पुढे जाऊन समाजमनामध्ये धोक्याची घंटी वाजवण्याचं कामही लेखापालने समाजहीत, लोकहीत लक्षात घेऊन करणे गरजेचे असते.

आपल्या पुरातन वेदवाङ्मयात पुराणात, भगवद्गीतेमध्ये व्यक्ती व समष्टीहित साधणारे असे अनेक विचारकण विखुरलेले दिसतात.

लेखापालनाशी व एकूणच वाणिज्य व अर्थव्यवहाराशी घट्ट निगडित असलेली दुसरी संस्था म्हणजे अखिल भारतीय Company Secretary Practice. त्यांचेही बोधवाक्य तैतेरिय उपनिषदातून घेतलेले आहे.

सत्यं वद, धर्मं चर।

सत्य बोला व धर्माने चाला. एखाद्या कंपनीचा व्यवहार Reports द्वारे शब्दबद्ध करतानाचा दिलेला जणू हा इशारा आहे. धर्माने म्हणजे कायद्याने असा अर्थ अभिप्रेत आहे. आपले कर्म (Duty) करत असताना ह्या दोन्ही वाणिज्य व्यवहार, एक प्रकारे अर्थव्यवहार चालवणाऱ्या मंडळींना घालून दिलेले हे दंडकच आहेत. जुन्या, जाणत्या, द्रष्ट्यांच्या वाणीमधून प्रकट झालेले हे परंपरागत शहाणपण जाणवत ठेवणं, गतीशील ठेवणं हे मात्र त्या त्या समाजाचं काम असतं.

भगवद्गीतेमधील कर्मयोगामध्ये (योगः कर्मसु कौशलम्) एकूणच समाजातील प्रत्येकाने कशाप्रकारे आपले कर्तव्यकर्म करीत राहून स्वहित व जनहित राखावे ह्यावर पदोपदी सुंदर भाष्य केले आहे. टिळकांच्या गीतारहस्यामध्ये कर्मविप्पकाचा हा सिद्धान्त अत्यंत तर्कनिष्ठ व द्रष्टेपणाने आलेला आहे. पण आपला आता काही तो मुख्य विषय नाही. तरीपण ४ पुरुषार्थांच्या संकल्पनेवर सहज नजर टाकली तरी वर उद्धृत केलेल्या दोन्ही बोधवाक्यांमधील विचाराला पृष्टी मिळते.

अर्थ – संपत्ती

काम – भोग, इच्छा, सुख

धर्म – नियम, कायदा, विवेक, विचार

मोक्ष – मुक्ती, कैवल्य

अर्थव्यवहाराला व कामव्यवहाराला धर्मांचे घट्ट कुंपण आपल्या पूर्वसुरींनी घालून दिले आहे. धर्म या शब्दाचे अनेक अर्थ गीतारहस्यामध्ये लोकमान्य टिळकांनी उकल करून दाखवले आहेत. Religion ह्या अर्थी वापरलेला धर्म हा शब्द म्हणजे फक्त एक तुलनेने नवा अर्थ आहे. संपत्ती मिळवताना, तिचा उपभोग घेताना विवेक बाळगणे हे किती महत्त्वाचे आहे हे आपण जाणतो हा विवेक.

हजारो वर्षांपूर्वी मानवी मनाचे, मानवी व्यवहारांचे इतके सूक्ष्म आकलन आपल्या द्रष्ट्या पूर्वसूरींना होते हे कोण बरं नाकारू शकेल? अर्थात हे इशारे लक्षात घेऊन वेळोवेळी तसा व्यवहार ठेवणे, डोळ्यांत तेल घालून समाजहीत जपणे हे आपले समाजकर्तव्य आहे असे मला वाटते. त्यात चूक झाल्यास तऱ्हेतऱ्हेचे Scams घोटाळे सहन करणे व समाजाला अधिक प्रतिगामी करणे हेच दुर्दैव आपल्या वाट्यास येईल. निवड आपली आहे.

**– डॉ. सुचित्रा नाईक**
प्राचार्या, जोशी-बेडेकर महाविद्यालय,
ठाणे

•••

---

(पृष्ठ क्र. ४ वरून - **माधव यशवंत गोखले यांचा जीवन वृत्तांत**)

न्यासातर्फे गुढीपाडव्या निमित्त गेली १८ वर्षे स्वागत यात्रेचे आयोजन केले जाते.

तसेच ठाण्यामध्ये सन २०१० साली मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे झालेल्या ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे प्रमुख सल्लागार आणि मराठी ग्रंथ संग्रहालयाचे काही वर्षे मा. अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना संदर्भात 'असं घडलं संमेलन' या नावाचे एक पुस्तक लिहून त्यांनी लेखक म्हणून नावलौकिक मिळविला होता.

**– अुत्तम भा. जोशी**
अध्यक्ष,
ठाणे भारत सहकारी बँक लि.

# सत्येंद्रनाथ बोस : पुंज भौतिकीचे जनक

*सत्येंद्रनाथ बोस यांची ४ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी. त्यांच्या महान कार्याची माहिती या लेखात विशद करण्यात आली आहे - संपादक*




(जन्म : १ जानेवारी १८९४, मृत्यू : ४ फेब्रुवारी १९७४)
https://vigyanprasar.gov.in/bose-satyendra-nath/

सामान्य अनुभवांना दूरस्थ असलेल्या नैसर्गिक आविष्कारांच्या तपासातून लाभलेला मुख्य मानवी निष्कर्ष म्हणजे वस्तुनिष्ठ ज्ञान आणि सुयोग्य प्रयोगांद्वारे निसर्गाला प्रश्न विचारून निस्संदिग्ध उत्तरे मिळवण्याचे आपले सामर्थ्य, यांतील अविभाज्यतेस मिळालेली मान्यता होय. - निल्स बोहर

सत्येंद्रनाथ बोस आणि मेघनाद साहा यांनी भारतात आधुनिक सैद्धांतिक भौतिकीची स्थापना केली. बोस यांनी सांख्यिक यामिकी (स्टॅटिस्टिकल मेकॅनिक्स), पुंज सांख्यिकी (क्वांटम स्टॅटिस्टिक्स), एकाच क्षेत्रसिद्धांताद्वारे सर्व बलांची व्याख्या करणे, क्ष-किरण विवर्तन आणि विद्युत्चुंबकीय लहरींचे मूलकांबरातील परस्परसंबंध या विषयांत लक्षणीय प्रगती घडवली. १९२४ मध्ये बोस यांनी कृष्णवस्तू प्रारण नियम शोधून काढला. मात्र त्याकरता मॅक्स कार्ल एर्नेस्ट लुडविग प्लँक (१८५४-१९४७) यांनी केला तसा अभिजात विद्युतगतीशास्त्राचा (क्लासिकल एलेक्ट्रोडायनामिक्स) वापर त्यांनी केला नाही. अल्बर्ट आइन्स्टाईन यांनी केलेल्या बोस यांच्या कार्याच्या व्यापकीकरणातून (जनरलायझेशन), सांख्यिकी पुंजयामिकी प्रणाली (सिस्टिम ऑफ स्टॅटिस्टिकल क्वांटम मेकॅनिक्स) अवतरली. आता ती 'बोस-आइन्स्टाईन सांख्यिकी' म्हणून ओळखली जाते. ही प्रणाली पूर्णांक फिरत (इंटिग्रल स्पिन), असलेल्या कणांचे वर्णन करते. हे अनेक कण एकच पुंजावस्था (क्वांटम स्टेट) व्यापत असतात. सत्येंद्रनाथ बोस यांच्या नावावरून अशा कणांना 'बोसॉन' म्हणूनच ओळखले जाते. यामुळे सत्येंद्रनाथ बोस यांचे नाव आधुनिक भौतिकीचा एक भाग झाले. भौतिकी पाठ्यपुस्तकांत आइन्स्टाईन यांच्यासोबत इतर कुणाचेही नाव एवढ्या स्पष्टतेने जोडले गेलेले नाही. बोस यांचे कार्य खरोखरीच लोकोत्तर आहे. आधुनिक भौतिकीच्या इमारतीचा ते मध्यवर्ती आधारस्तंभ ठरलेले आहे.

बोस हे बहुरूपदर्शकाचे (कॅलिडोस्कोपचे) अष्टपैलूत्व आणि सदाबहार उत्साह यांचा अपवादात्मक संयोग होते. वयाची विशी पार करण्यापूर्वीच त्यांनी गणितीय भौतिकीत एक महत्त्वाचे योगदान दिलेले होते. रसायनशास्त्र, खनिजशास्त्र, जीवशास्त्र, मृदाविज्ञान, तत्त्वज्ञान, पुरातत्त्वशास्त्र, अभिजात कला, साहित्य आणि भौतिकशास्त्रासारख्या विविध क्षेत्रांत त्यांनी काम केलेले आहे.

भारतात बोस यांचे नाव लोकांना फारसे ज्ञात नाही. भारतीय विज्ञानाची ही अवस्था दुःखदच आहे. जी. वेंकटरामन म्हणतात, 'भौतिकशास्त्रात सत्येंद्रनाथांचे नाव चिरकाल टिकून राहील. दुर्दैवाने भारतातील बव्हंशी लोकांनी त्यांचे नाव कधीही ऐकलेलेच नाही. आपल्या बहुतेक शास्त्रज्ञांनाही त्यांच्या नावाव्यतिरिक्त त्यांचेबाबत फारसे काही माहीत नाही असे आढळले तरी मला

त्याचे आश्चर्य वाटणार नाही. मी पैज लावायला तयार आहे. तुरळक सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञ वगळल्यास, आपल्या भौतिकी जगतातील बहुसंख्य शास्त्रज्ञांनाही बोस यांचेबद्दल फारशी माहिती नाही. त्यांचे नाव जरी त्यांनी ऐकलेले असले तरी, त्यांच्या कामाचे महत्त्व त्यांना माहीत असेलच असे नाही.'

सत्येंद्रनाथांचा जन्म १ जानेवारी १८९४ साली कोलकात्यात झाला. नादिया जिल्ह्यातील बारा जगुलिया गावी त्यांचे घर होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कोलकाता अजून महानगर म्हणून उदयास आलेले नव्हते. बंगालमधील सांस्कृतिक आणि बौद्धिक घडामोडींचे केंद्र नादियाच होते. नादियातील बोलीभाषेसच पुढे प्रमाण बंगाली भाषा म्हणून मान्यता मिळाली. सुरेंद्रनाथ बोस आणि आमोदिनी बोस यांचे ते सर्वात ज्येष्ठ पुत्र होते. त्यांना सहा बहिणी होत्या. सुरेंद्रनाथ रेल्वेत काम करत असत. सत्येंद्रनाथांचे आजोबाही सरकारी सेवेतच होते. घरानजीकच्या 'नॉर्मल स्कूल' मध्ये त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. याच शाळेत रवींद्रनाथ टागोरही काही काळ शिकत असत. ते पुढे स्वतःच्या घरात राहायला गेल्याने मग शाळाही बदलावी लागली. यावेळी ते 'न्यू इंडियन स्कूल' मध्ये भरती झाले आणि पुढे मग 'हिंदू स्कूल' मध्ये जाऊ लागले.

'हिंदू स्कूल' मधील गणित शिक्षक उपेंद्र बक्षी एक विख्यात व्यक्ती होते. एकदा त्यांनी एका चाचणी परीक्षेत बोस यांना १०० पैकी ११० गुण दिले! हे काहीसे चमत्कारिकच वर्तन होते. त्याकरता मुख्याध्यापकांनी स्पष्टीकरण मागितले. शिक्षकांना त्यांच्या वर्तनाबाबत जराही खंत वाटत नव्हती. ते उत्तरले, 'सत्येन याने पर्यायी प्रश्नांतील आवश्यक तेवढेच प्रश्न न सोडवता, सर्वच्या सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे दिलेल्या वेळात पूर्ण केली.' १९०८ साली ते प्रवेश परीक्षा देणार होते. मात्र परीक्षेच्या दोन दिवस आधी त्यांना कांजिण्या झाल्या. ते परीक्षेला बसूच शकले नाहीत. बोस यांनी हा काळ प्रगत गणित आणि संस्कृत वर्गाचे अभ्यास करण्यात उपयोगात आणला. १९०९ साली ते 'हिंदू स्कूल' मधूनच प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले.

त्यानंतर ते इंटरमिडिएट सायन्स कोर्स करता कोलकत्त्यातील प्रेसिडेन्सी कॉलेजात रुजू झाले. इथे त्यांना प्रफुल्लचंद्र रे (१८६१-१९४२) आणि जगदीशचंद्र बोस (१८५८-१९५७) हेही शिकवत असत. इंटरमिडिएट परीक्षा ते १९११ साली उत्तीर्ण झाले. इथे हे नमूद करावे लागेल की, या परीक्षेकरता शरीरविज्ञान हाही एक विषय त्यांना अभ्यासाकरता होता. त्यात त्यांना शंभर पैकी शंभर गुण मिळाले होते. १९१३ साली ते प्रथम क्रमांकाने बी.एस.सी ऑनर्स उत्तीर्ण झाले. अलीकडच्या परिभाषेप्रमाणे ते उपयोजित गणित किंवा गणितीय भौतिकीत एम.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झाले. याही परीक्षेत ते पहिलेच आले. एवढेच नव्हे तर ९२% गुण प्राप्त करून त्यांनी कलकत्ता विद्यापीठाच्या इतिहासात नवा उच्चांकही प्रस्थापित केला होता. दोन्हीही परीक्षांत मेघनाद साहा दुसरे आलेले होते. नवीनच सुरू झालेल्या 'युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ सायन्समध्ये' दोघेही व्याख्याते म्हणून रुजू झाले.

सैद्धांतिक भौतिकशास्त्रातील बोस यांचे पहिले महत्त्वाचे काम म्हणजे साहा यांच्यासोबत लिहिलेला 'रेणूंच्या सांत आकारमानाचा प्रावस्था समीकरणावरील प्रभाव (ऑन द इन्फ्लुएन्स ऑफ द फायनाईट वॉल्यूम ऑफ मॉलिक्युल्स ऑन द इक्वेशन ऑफ स्टेट)' हा एक शोधनिबंध होता. १९१८ साली 'फिलॉसॉफिकल मॅगझिनमध्ये' तो प्रकाशित झाला. १९२० साली पुन्हा साहा यांचेसोबत मिळून त्यांनी 'फिलॉसॉफिकल मॅगझिनमध्ये' 'प्रावस्था समीकरणां'वर एक संयुक्त शोधनिबंध प्रकाशित केला. त्यानंतर १९२० सालीच, बोस यांचा 'वर्णपट प्रारण सिद्धांतावरून राईडबर्ग नियमाचे निष्कर्षण (ऑन द डिडक्शन ऑफ राईडबर्ग्ज लॉ फ्रॉम क्वांटम थेअरी ऑफ स्पेक्ट्रल एमिशन्स)' हा शोधनिबंध 'फिलॉसॉफिकल मॅगझिनमध्ये' प्रकाशित झाला.

१९२१ मध्ये डाक्का विद्यापीठाची स्थापना होताच बोस तिथल्या भौतिकशास्त्र विभागात प्र-पाठक म्हणून रुजू झाले. डाक्का विद्यापीठातील स्नातकोत्तर विद्यार्थ्यांना प्लँकच्या प्रारण नियमाची तत्कालीन पद्धतीने उकल करून दाखवत असताना, त्यांना ती असमाधानकारक वाटली. साहा यांच्यासोबत त्यावर चर्चा केल्यानंतर बोस यांनी त्याकरता आइन्स्टाईन यांच्या प्रकाशकण संकल्पनेवर आधारित समाधानकारक उकल तयार केली. पूर्वीप्रमाणेच त्यांनी आपला शोधनिबंध 'फिलॉसॉफिकल मॅगझिनमध्ये' प्रकाशित करण्यासाठी पाठवला. मात्र त्यांनी तो नाकारल्यामुळे ते निराश झाले. मग त्यांनी आपला शोधनिबंध 'zeitschrift fr physi' या नियतकालिकात प्रकाशित करण्यासाठी पाठवला. हा एक धाडसी निर्णय होता. त्याकरता त्यांनी आइन्स्टाईन यांना लिहिलेले एक पत्र विज्ञानाच्या इतिहासात आता महत्त्वाचा दस्त झाले आहे. ४ जून १९२४ च्या पत्रात बोस लिहितातः

आपले मत आणि कार्यवाही यांकरता सोबतचा लेख तुम्हाला पाठवण्याचे साहस मी करत आहे. त्याबाबत आपला अभिप्राय जाणून घेण्यास मी उत्सुक आहे. आपल्या लक्षात येईल की, केवळ काळ आणि अवकाश यांतील प्राथमिक क्षेत्रे गृहित धरून, अभिजात विद्युत गतिकीनिरपेक्षपणे, प्लँक यांच्या नियमातील सहगुणक शोधून काढण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. संपूर्ण शोधनिबंधाचा अनुवाद करू शकेन एवढे जर्मन भाषेचे ज्ञान मला नाही. आपल्याला जर हा शोधनिबंध 'zeitschrift fr physi' या नियतकालिकात प्रकाशनास योग्य वाटला तर तशी व्यवस्था करावी. मी त्याकरता कृतज्ञ असेन. आपल्याकरता मी संपूर्णपणे अपरिचित असलो तरी ही विनंती करतांना मला संकोच वाटत नाही. कारण आम्ही सारेच आपले विद्यार्थी आहोत. आपल्या लिखाणांतून आपल्या शिकवणुकीचा आम्ही लाभ घेत असतो. मागे सापेक्षतेबाबतच्या आपल्या लेखांचा इंग्रजी अनुवाद करण्याची अनुमती कोलकात्याहून कुणीतरी मागितलेली आपणास आठवते काय? आपण तशी अनुमती दिलेली होतीत. आता तर पुस्तकही प्रकाशित झालेले आहे. व्यापक सापेक्षतेवरील त्या आपल्या शोधनिबंधांचा अनुवाद मीच केलेला होता.

आइन्स्टाईन यांनी बोस यांच्या पत्राची दखल घेतली एवढेच नव्हे तर त्यांना आश्वस्तही केले की, ते स्वतः या संशोधनास महत्त्वाचे मानत असल्याने ते त्यास प्रकाशित करवून घेतील. आइन्स्टाईन यांनी स्वतः बोस यांच्या शोधनिबंधाचा जर्मन अनुवाद केला आणि मग तो लेख 'zeitschrift fr physi' या नियतकालिकाच्या ऑगस्ट-१९२४ च्या अंकात प्रकाशित झाला. त्याचे शीर्षक होते Plancksgesetz Lichtquantenhypothese (प्लँकचा नियम आणि प्रकाशाचे पुंज गृहितक). अनुवादकाचा अभिप्राय म्हणून असे लिहिले होते की, बोस यांनी काढलेले प्लँक नियमाचे सूत्र म्हणजे प्रगतीच्या दिशेने टाकलेले एक पुढचे पाऊल आहे. इथे वापरलेली पद्धत आदर्श वायूचा पुंजसिद्धांतही देते. मीही हे अन्यत्र दाखवणारच आहे. अशा रीतीने पुंज सांख्यिकीचा जन्म झाला. इथे हेही नमूद केले पाहिजे की, सांख्यिकी संकल्पनांचा भौतिकीतील प्रवेश, जेम्स क्लर्क मॅक्सवेल (१८३१-१८७९) आणि लुडविग एडवर्ड बोल्टझमन (१८४४-१९०६) यांच्या वायूगतिकीसिद्धांतावरील कामामुळे, सुमारे एक शतकापूर्वीच झाला होता. आइन्स्टाईन यांनी बोस यांच्या पद्धतीचा उपयोग आदर्श पुंज वायू सिद्धांत देण्यासाठी केला आणि बोस-आइन्स्टाईन संघननाच्या आविष्काराचे भाकीतही केले (प्रेडिक्टेड बोस-आईन्स्टाईन कन्डेन्सेशन फिनॉमिनॉन).

जेव्हा बोस पुन्हा एकदा प्लँक यांच्या नियमाची उकल करत होते तेव्हा मात्र त्यांना याची जाणीवही नव्हती की, ते एक क्रांतीकारक शोध लावत आहेत. प्लँक यांचा नियम माहीत झाल्याला वीसहून अधिक वर्षे होऊन गेलेली होती आणि त्या करताच्या अनेक उकली अस्तित्वात आलेल्या होत्या. स्वतः आइन्स्टाईन यांनी केलेली एक उकलही त्यात होतीच. जे. मेहरा

यांना बोस म्हणाले होते की, 'मला कल्पना नव्हती की, मी केलेले काम एक नावीन्यपूर्ण काम आहे. मला वाटे की, वस्तूंकडे पाहण्याचा बहुधा तोच एक दृष्टीकोन आहे. मी खरोखरीच काही मोलाचे करत आहे हे समजण्याएवढा मी सांख्यिकी तज्ज्ञ नव्हतो.' मात्र बोल्टझमन यांनी त्यांची सांख्यिकी वापरून जे काही केले असते त्याहून ते खरोखरीच निराळे होते. प्रकाशाच्या पुंजांना केवळ कण मानण्याऐवजी मी त्यांना अवस्था समजून त्यांविषयी बोलत असे. कसेही असले तरी, मी आइन्स्टाईन यांना भेटलो होतो, तेव्हा त्यांनी विचारलेला प्रश्न हाच होता की, 'प्लँक यांचे सूत्राप्रत पोहोचण्याकरता, मी या पद्धतीपर्यंत कसा पोहोचलो?' प्लँक आणि आइन्स्टाईन यांच्या प्रयासांतील विरोधाभास मी हेरला आणि माझ्या पद्धतीने सांख्यिकीचा वापर केला. मात्र ते बोल्टझमन यांच्या सांख्यिकीहून निराळे आहे असे मी मानत नव्हतो. इथे त्याची नोंद करावी लागेल की, अगदी आइन्स्टाईनही बोस यांच्या संकल्पनेचे संपूर्ण सामर्थ्य जाणू शकले नव्हते आणि उपायोजन संभावनांचे भाकीतही करू शकलेले नव्हते. नंतर फर्मींनी केलेल्या विकासाने, मूलभूत कणांचे दोन गटांत वर्गीकरण करण्याचा आधार पुरवला. बोस यांचे नाव दिले गेलेले 'बोसॉन' आणि फर्मी यांचे नाव दिले गेलेले 'फर्मिऑन्स'.

१९२४ साली बोस यांनी डाक्का विद्यापीठातून दोन वर्षांची रजा घेतली. ज्या दरम्यान ते त्यांच्या क्षेत्रातील प्रचलित विकासाची अवस्था जाणून घेण्याकरता युरोपात जाणार होते. आइन्स्टाईन यांनी लिहिलेले प्रशंसात्मक पोस्टकार्ड, डाक्का विद्यापीठाच्या कुलगुरूंना दाखवल्यावरच त्यांना तशी अनुमती मिळालेली होती. त्यामुळेच बोस यांनी आइन्स्टाईन यांना लिहिलेल्या एका पत्रात लिहिले की, 'आपले पहिले पोस्टकार्ड निर्णायक क्षणी येऊन पोहोचले आणि इतर कशाहीपेक्षा, त्यामुळेच माझा हा युरोपातील निवास शक्य झाला आहे.'

बोस ऑक्टोबर १९२४ मध्ये युरोपात पोहोचले. बर्लिनला जाऊन आइन्स्टाईन यांना भेटण्यापूर्वी काही आठवडे पॅरीसमध्ये व्यतीत करावे असा त्यांचा हेतू होता. जर्मन भाषेपेक्षाही फ्रेंच भाषा त्यांना अधिक सोयीची भासे. मात्र पुढे पॅरीसमध्ये ते जवळपास एक वर्ष राहिले. मेहरांना याचे स्पष्टीकरण देताना ते लिहितात, 'विदेशात मला थेट बर्लीनलाच जायचे होते. मात्र मी थेट जाण्याचे साहस केले नाही. कारण मला माझ्या जर्मन भाषेच्या ज्ञानाबद्दल खात्री नव्हती. बहुधा काही आठवडे पॅरीसमध्ये व्यतीत केल्यावर मी बर्लीनला आइन्स्टाईन यांना भेटायला जाऊ शकेन असा विचार करून मी बाहेर पडलो. मात्र त्यानंतर दोन गोष्टी घडून आल्या. तिथे पोहोचल्यावर माझ्या स्वागतास तिथे उपस्थित असलेल्या माझ्या मित्रांनी मला ते राहत होते त्या प्रवासीनिवासात (बोर्डिंग हाऊसमध्ये) नेले. मी तिथेच राहावे असा त्यांनी आग्रहही केला. मलाही मित्रांसोबत राहणे सोयीचे वाटले.'

पॅरीसला पोहोचल्यावर त्यांनी आइन्स्टाईन यांना पत्र लिहून त्यांचेसोबत काम करण्याची अनुमती मागितली. दुसऱ्या शोधनिबंधावरील त्यांचा अभिप्रायही विचारला. ते लिहितात :

माझा शोधनिबंध स्वतः अनुवाद करून प्रकाशित केलात, त्याखातर मी अंतःकरणपूर्वक कृतज्ञ आहे. जूनच्या मध्यावर मी आणखीही एक शोधनिबंध पाठवला आहे. त्याचे शीर्षक, पदार्थांच्या उपस्थितीत प्रारणीय क्षेत्रातील औष्णिक संतुलन (थर्मल इक्विलिब्रियम इन द रेडिएशन फिल्ड इन द प्रेझेन्स ऑफ मॅटर) आहे. आपला अभिप्राय जाणून घेण्यास मी उत्सुक आहे, कारण मला तो महत्त्वाचाच वाटतो. 'zeitschrift fr physi' या नियतकालिकात हाही प्रकाशित होईल काय ते मला माहीत नाही. माझ्या विद्यापीठाने मला दोन वर्षांची रजा देऊ केलेली आहे. एका आठवड्यापूर्वीच मी पॅरीसमध्ये आलेलो आहे. आपल्यासोबत जर्मनीत मला कार्य करता येणे शक्य होईल काय तेही मला माहीत नाही. मात्र आपण मला तशी अनुमती दिलीत तर मला आनंद होईल. माझे दीर्घकाळ जोपासलेले स्वप्न त्यामुळे सत्यात उतरू शकेल.

---

विचार न करता शिकणे हे निरुपयोगी असते; तर न शिकता विचार करणे हे धोकादायक असते.

आइन्स्टाईन यांनी बोस यांचा दुसरा शोधनिबंध मिळाल्याची पोच दिली नव्हती. मात्र या वेळी त्यांनी उत्तर दिले. ३ नोव्हेंबर १९२४ रोजी बोस यांना लिहिलेल्या पत्रात ते लिहितात, 'आपल्या २६ ऑक्टोबरच्या पत्राकरता मनःपूर्वक धन्यवाद. आपल्याशी परिचय होण्याची संधी मला लवकरच मिळेल याचा मला आनंद आहे. आपले शोधनिबंध काहीसे पूर्वी, आधीच प्रकाशित झाले आहेत. दुर्दैवाने त्याच्या प्रती तुम्हाला पाठवल्या जाण्याऐवजी मलाच पाठवल्या गेलेल्या आहेत. प्रारण आणि पदार्थ यांतील परस्परसंबंधाच्या संभाव्यतेबाबतच्या तुम्ही दिलेल्या मूलभूत तत्त्वाशी मी सहमत नाही. अभिप्रायात मी त्याकरताची कारणेही नोंदवली आहेत. तुमच्या शोधनिबंधांसोबतच तीही प्रकाशित झालेली आहेत. तुम्ही इथे याल तेव्हा आपण त्यावर तपशिलाने चर्चा करू. दुसऱ्या शोधनिबंधावरील आइन्स्टाईन यांच्या या अभिप्रायामुळे बोस स्वाभाविकतः निराश झाले. मात्र त्यांनी आइन्स्टाईन यांनी उपस्थित केलेल्या हरकतींवर गांभीर्याने विचार सुरू केला. आइन्स्टाईन यांना त्यांनी कळवले की, त्यांच्या टीकेस ते एका शोधनिबंधाद्वारे उत्तर देण्याचा प्रयत्न करत आहेत. वस्तुतः बोस यांनी त्याचे हस्तलिखित पॉल लँगेव्हिअन (१८७२–१९४६) यांना पॅरीसमध्येच दाखवलेले होते. ते प्रकाशित होण्याच्या दर्जाचे आहे असे त्यांना वाटत होते. मात्र तो शोधनिबंध कधीही प्रकाशित झाला नाही.

पॅरीसमध्ये बोस यांचे एक मित्र प्रबोध बागची यांनी त्यांची ओळख सिल्व्हियन लेव्ही यांचेशी करून दिली. ते तेथील विख्यात भारतविद्यातज्ज्ञ (इंडॉलॉजिस्ट) होते. त्यांनीच मग पॉल लँगेव्हिअन यांच्याकरता बोस यांचा परिचय करून देणारे पत्र दिले. सैद्धांतिक आणि प्रायोगिक भौतिकशास्त्रातील अद्ययावत विकासाची तोंडओळख करून घेण्याचा बोस यांचा उद्देश होता. त्यानुसार बोस यांनी असा विचार केला की, त्यांनी प्रारणसक्रिय तंत्रे मेरी क्युरी (१८६७–१९३४) यांचेकडून शिकून घ्यावी. क्ष–किरण वर्णपटदर्शनशास्त्रा (एक्स–रे स्पेक्ट्रोस्कोपी) बाबतही मॉरीस द ब्रॉगिली (१८९२–१९६७) यांचेकडून शिकून घेण्याची त्यांना इच्छा होती. लँगेव्हिअन यांनी असे सुचवले की, बोस यांनी क्युरी यांच्या प्रयोगशाळेत काम करता येण्याची शक्यता पडताळून पाहावी. त्यांनी क्युरींकरता बोस यांना ओळखपत्र दिले. त्यानुसार बोस क्युरींना भेटले. क्युरीनी हे ओळखले की, बोस बुद्धिमान आहेत. तरीही सुरुवातीस स्वतःच्या प्रयोगशाळेत त्यांना प्रवेश देण्याबाबत त्यांचा निर्णय होत नव्हता. त्यांना बोस यांच्या फ्रेंच भाषेच्या ज्ञानाबाबत साशंकता होती. त्यापूर्वी त्यांना एका भारतीय विद्यार्थ्याबाबत आलेल्या असमाधानकारक अनुभवाचाच हा परिणाम होता. त्या विद्यार्थ्यास फ्रेंच भाषेचे काहीच ज्ञान नव्हते. यास्तव त्यांनी बोस यांना, फ्रेंच भाषा जाणणे किती महत्त्वाचे आहे, यावर एक मोठेच भाषण ऐकवले. त्यामुळे मग काही महिने फ्रेंच शिकून बोस परत क्युरींच्या प्रयोगशाळेत गेले. तिथे त्यांनी दाबविद्युत प्रभावाबाबत काही अवघड मापने केली. मात्र बोस यांची प्रारणसक्रियतातंत्रे शिकण्याची इच्छा फलद्रूप झाली नाही. लँगेव्हिअन यांनी दिलेले ओळखपत्र घेऊन बोस ब्रॉगिलींना भेटले. त्यांनी बोस यांना त्यांच्या मुख्य साहाय्यक असलेल्या अलेक्झांडर दौव्हिलिअर यांचेसोबत काम करण्याची अनुमती दिली. ब्रॉगिलींच्या प्रयोगशाळेत बोस स्फटिकालेखनाची विविध तंत्रे शिकले, एवढेच नव्हे तर, स्फटिक वर्तनांच्या सैद्धांतिक पैलूंत त्यांना रुचीही निर्माण झाली.

तिथे सुमारे एक वर्ष राहिल्यानंतर, ऑक्टोबर १९२५ मध्ये बोस बर्लीनला गेले. आइन्स्टाईन यांना भेटण्यास ते उत्सुक होते. ते मात्र त्यांच्या वार्षिक भेटीकरता लेडनला गेलेले होते. बोस यांनी आइन्स्टाईन यांचेसोबत काम केले नाही. मात्र त्यांची भेट त्यांच्याकरता लाभदायक ठरली. आइन्स्टाईन यांनी त्यांना दिलेल्या ओळखपत्राच्या आधारे ते विद्यापीठाच्या वाचनालयातून पुस्तके नेऊ शकत, भौतिकशास्त्रातील व्याख्यानांना उपस्थित राहू

शकत असत. आइन्स्टाईन यांच्या मदतीने काही सर्वोच्च जर्मन शास्त्रज्ञांना ते भेटू शकले. फ्रित्झ हेबर (१८६८–१९३४), ऑट्टो हान (१८७९–१९६८), लिझ माईटनर (१८७८–१९६८), वॉल्थर बोथे (१८९१–१९५७), मायकेल पोलान्यी, मॅक्स व्हॉन लौए (१८७९–१९६०), वॉल्टर गॉर्डन (१८९३–१९४०), पॉल युजीन विग्नर (१९०२–१९९५) आणि इतरांचा त्यांत समावेश होता. पोलान्यी यांच्या प्रयोगशाळेत त्यांनी क्ष–किरण स्फटिकालेखनावर काम केले आणि गॉर्डन यांचेसोबत सैद्धांतिक कामात व्यग्र झाले. हान आणि माईटनर यांच्या किरणोत्सार प्रयोगशाळेसही त्यांनी वारंवार भेटी दिल्या. बोस गॉटिंगटन यांनाही भेटले. तिथेच त्यांची भेट मॅक्स बॉर्न (१८८२–१९७०) आणि एरिच हकल (१८९६–१९८०) यांचेशीही झाली.

१९२६ च्या उत्तरार्धात बोस डाक्क्याला परतले. तिथे १९२७ साली बोस यांची प्राध्यापक आणि भौतिकशास्त्र विभागप्रमुख म्हणून नियुक्ती झाली. ते प्रायोगिक भौतिकीत काम करू लागले. त्यांनी स्फटिक सं–रचनांचा अभ्यास सुरू केला. बहुधा देशात अशा प्रकारचा अभ्यास प्रथमच सुरू झालेला होता. स्वतःच्या प्रायोगिक उपस्कराचे अभिकल्पन त्यांनी स्वतःच हाती घेतले. त्यांनी क्ष–किरण विवर्तन प्रकाशचित्रक अभिकल्पित करून तयारही केला. परिभ्रमण चित्रण आणि पूड (पावडर) चित्रणास तो उपयुक्त ठरला. दंडगोलाकार प्रकाशचित्रकात नोंदित, लौए प्रकाशचित्रांच्या, परावर्तन प्रतलांचे निर्देशांक शोधून काढण्याकरता त्यांनी एक सोपी पद्धत तयार केली. त्यांना रसायनशास्त्रातही स्वारस्य होते. १९३८ मध्ये प्रारणलहरींच्या मूलकांबरातील परावर्तनांचा त्यांनी अभ्यास केला.

१९४५ साली बोस कोलकात्यात परत आले. आता ते कलकत्ता विद्यापीठातील भौतिकशास्त्राचे खरे प्राध्यापक झालेले होते. १९५३–५४ दरम्यान बोस यांनी, एकीकृत क्षेत्रसिद्धांतावर (युनिफाईड फिल्ड थेअरीवर) पाच महत्वाचे शोधनिबंध प्रकाशित केले. हे शोधनिबंध खूप महत्त्वाचे होते. त्यांनी हे शोधनिबंध आइन्स्टाईन यांनाही पाठवले. भौतिकशास्त्रात किती नेमकेपणाने बोस यांची समाधानपद्धती उपयोगात आणता येईल याबाबत आइन्स्टाईन साशंक होते. त्यांच्या एका शोधनिबंधात त्यांनी यावर चर्चाही केलेली आहे. बोस यांनीही त्यास तपशिलाने उत्तर दिले. सापेक्षता सिद्धांताच्या सुवर्णमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त होऊ घातलेल्या समारोहप्रसंगी आइन्स्टाईन यांना प्रत्यक्ष भेटून बोस यावर चर्चाही करणार होते. मात्र तसे घडले नाही. १९५५ मध्येच आइनस्टाईन निवर्तले.

१९४६ मध्ये पॉल डिरॅक यांनी ३ अण्वंतर्गत कणांची वर्गवारी करताना, अनुक्रमे सत्येंद्रनाथ बोस आणि एन्रिको फर्मी यांच्या सन्मानार्थ अण्वंतर्गत कणांच्या दोन वर्गांना प्रथमच, अनुक्रमे 'बोसॉन' आणि 'फर्मिऑन' म्हटले. बोस यांची सांख्यिकी अनुसरणारे कण 'बोसॉन' ठरले, तर फर्मी–डिरॅक सांख्यिकी अनुसरणारे कण 'फर्मिऑन' ठरले. 'बोसॉनां'ची फिरत (स्पिन) पूर्णांक संख्या असते, तर 'फर्मिऑनां'ची फिरत विषम संख्या भागिले दोन इतकी असते.

युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ सायन्सच्या शुद्ध भौतिकी प्रयोगशाळेत, बोस यांनी सेंद्रिय रसायनशास्त्र प्रयोगशाळा स्थापन केलेली होती. बोस यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधक विद्यार्थांच्या एका गटाने भारतीय मातीतील खनिजांचा विस्तृत अभ्यास सुरू केला. क्ष–किरणे, रासायनिक विश्लेषणे आणि धनमूलक विनिमय तंत्रे (कॅट आयॉन एक्सचेंज टेक्निक्स) यांचा उपयोग ते करत होते. भारतीय गंधक खनिजांत त्यांनी जर्मेनियमचा प्रणालीबद्ध शोध सुरू केला. बोस यांच्यासोबत अनेक क्षराभांच्या (अल्कलाईडांच्या) संरचना आणि त्रिमिती रसायनशास्त्र (स्टिरिओ केमिस्ट्री) यांवर काम केलेल्या एक विख्यात भारतीय रसायनशास्त्रज्ञ डॉ. असिमा चॅटर्जी म्हणतात, असेंद्रिय संश्लिष्ट क्षार आणि मातीतील

खनिजांवरील काम हे प्रा. बोस यांचे आणखी एक प्रमुख योगदान होते. मोठ्या संख्येतील मातीचे नमुने, देशाच्या निरनिराळ्या भागांतील खडक आणि धूळ अभ्यासिली गेली. क्ष-किरण विवर्तन पद्धती आणि फरकात्मक उष्णता विश्लेषणे यांचा उपयोग या करता करण्यात आला. त्यात, धुळीतील सामान्य खनिजांची अणुसंरचना जाणून घेणे हा उद्देश होता. या तपासात एक जुळणीपरिवर्तनशील सपाट पाटी प्रकाशचित्रक (ॲडजस्टिबल फ्लॅट प्लेट कॅमेरा) अभिकल्पिला आणि वापरला गेला. वर्तमान तपासात वापरलेल्या फरकात्मक उष्णता विश्लेषक बर्केलहेमर अभिकल्पनाबरहुकूम तो निर्माण करण्यात आला होता. हा प्रकल्प हाती घेतला तेव्हा या विषयावर भारतात त्याकाळी खूप कमी काम झालेले होते. विविध बदलत्या परिस्थितींत माती घडत असल्याने, आजवर न शोधल्या गेलेल्या भागांतील खनिजांचा अभ्यास करणे, नवीन माहिती मिळवण्याकरता आणि वैधता पडताळणी करताही महत्त्वाचे असते. हा उद्देश लक्षात घेता, प्रयोगशाळेत निरनिराळ्या स्रोतांतून मिळवलेल्या आणि वेगळ्या ठेवलेल्या अनेक भारतीय मृदांच्या अभ्यासाकरता फरकात्मक उष्णता विश्लेषक आणि एक सूक्ष्मकेंद्र क्ष-किरण नलिका अभिकल्पित केली गेली.

बोस यांच्यासाठी केवळ भौतिकशास्त्रच महत्त्वाचे नव्हते. त्यांच्या स्वारस्याची क्षेत्रे अपरिमित होती. या संदर्भात बी.एम. उद्गावकर बोस यांचेबाबत म्हणतात की, 'अल्पसंतुष्ट राहिल्याने ते मागे राहिले. ते भौतिकशास्त्र आणि गणितात प्रशिक्षित होते. त्यांची तल्लख, कुशाग्र आणि अष्टपैलू बुद्धी त्यांना; रसायनशास्त्र, जीवशास्त्र, मृदाविज्ञान, खनिजशास्त्र, तत्त्वज्ञान, पुरातत्त्व, अभिजात कला, साहित्य आणि संगीत इत्यादी विविध क्षेत्रे आपल्या कर्तृत्वाने व्यापून टाकणे शक्य करीत असे.' १९५४ साली वयाच्या साठाव्या वर्षी कौशल्यपूर्ण कार्याचा परिचय देत, त्यांनी एकीकृत क्षेत्रसिद्धांतावरील काही महत्त्वाचे शोधनिबंध प्रकाशित केले. त्यावरून त्यांचे गणिती कौशल्य अजूनही तेवढेच सक्षम असल्याचे सिद्ध होत होते. त्यांच्या विज्ञानातील अतुल्य कार्याच्या गौरवार्थ १९५४ साली पद्मविभूषण पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

१९५६ मध्ये बोस हे रवींद्रनाथांनी शांतिनिकेतन येथे स्थापन केलेल्या 'विश्व भारती विद्यापीठा'चे कुलगुरू झाले. त्यांनी आता तेथे विज्ञान शिकवण्यास सुरुवात केली. नव्याने निर्मिलेल्या विद्यापीठात त्यांना आता वैज्ञानिक संशोधनही सुरू करायचे होते. इथे हे नमूद केले पाहिजे की, टागोरांनी त्यांचे पुस्तक 'विश्व परिचय' हे बोसांना समर्पित केलेले आहे. १९५८ मध्ये रॉयल सोसायटी ऑफ लंडनचे ते फेलो निवडले गेले. १९५९ मध्ये त्यांची 'राष्ट्रीय प्राध्यापक' म्हणून नियुक्ती झाली. ते आमरण या पदावर राहिले.

सभा, परिषदांत किंवा सार्वजनिक व्यासपीठांवर बोस बहुधा डोळे मिटून घेत असत. लोकांना वाटत असे की, त्यांना झोपच लागली आहे. मात्र सर्व वेळ ते अत्यंत सावध असत. एस. डी. चटर्जी सांगतात, ''एकदा साहा इन्स्टिट्यूट ऑफ न्युक्लिअर फिजिक्समध्ये प्रा. निल्स बोहर एक व्याख्यान देत होते. बोस यांनी डोळे मिटून घेतलेले होते आणि असे वाटत होते की, त्यांना झोप लागली असावी. मात्र फळ्यावर काही लिहित असतांना बोहर अडखळले आणि म्हणाले की, 'बहुधा प्रा. बोस इथे मला मदत करू शकतील.' तेव्हा ताबडतोब त्यांनी डोळे उघडले, गणिती मुद्दा स्पष्ट केला आणि मग पुन्हा ध्यानस्थ झाले. आणखी एका प्रसंगी, त्याच ठिकाणी, प्रा. फ्रेडरिक जोलिओट क्युरी यांच्या व्याख्यानाकरता ते अध्यक्ष होते. व्याख्यात्याची इंग्लिशमध्ये ओळख करून दिल्यानंतर नेहमीप्रमाणे त्यांनी डोळे मिटून घेतले. मग प्रा. जोलिओट यांनी फ्रेंचमधून इंग्रजीत अनुवाद करणाऱ्या व्यक्तीची मदत मागितली. कुणीच समोर आले नाही. तेव्हा प्रा. बोस यांनी डोळे उघडले. ते उभे राहिले आणि प्रा. जोलिओट यांच्या भाषणाचा त्यांनी दर वाक्यागणिक अनुवाद केला.''

बोस यांचे संगीत आणि अभिजात कलांवर प्रेम होते. एस. डी. चॅटर्जी लिहितात, 'बोस यांच्या व्यक्तिमत्त्वातून त्यांची बुद्धिमत्ता प्रकट होत असे. लोक त्यांना त्यांच्या हयातीतच महान व्यक्ती मानत असत. अनेकदा अनौपचारिक संगीत सभांत, अभिजात संगीताचे रसिक असलेले बोस, डोळे मिटून घेत असत, झोपले आहेत असेच वाटे. शेवटास ते डोळे उघडत आणि सादरकर्त्यास अत्यंत प्रसंगोचित असा प्रश्न विचारत असत. त्यांना वादनास्वाद कमालीचा आवडत असे. ते स्वतः उत्तमरित्या एस्राज वाजवतही असत २. घराच्या एकाकी कोपऱ्यात एस्राज वाजवत असतांना लोकांनी त्यांना पाहिलेले आहे. कित्येकदा अशा एखाद्या प्रसंगी त्यांच्या डोळ्यांतून अश्रूही ओघळत असत. ते एस्राज वाजवत असत हे बहुश्रुतच आहे. मात्र ते बासरीही वाजवत असत हे मात्र बहुतेकांना माहीत नसते. अभिजात कलांत त्यांना स्वारस्य होते. जैमिनी रॉय यांच्यासारख्या तज्ज्ञांसोबत ते भित्तीचित्रांच्या लावण्याची चर्चाही करत असत. संगीत रजनीस, सांस्कृतिक कार्यक्रमास वा कलाप्रदर्शनास बोलावले असता, उपस्थित राहण्यास ते क्वचितच नकार देत. संगीत त्यांना आधीपासूनच प्रिय होते. लोकसंगीतापासून तर अभिजात संगीतापर्यंत आणि भारतीय संगीतापासून तर पाश्चात्य संगीतापर्यंत त्यांच्या आवडीचा पल्ला विस्तारलेला होता. प्रा. धुर्जटीप्रसाद मुखर्जी त्यांचे भारतीय संगीतावरील पुस्तक लिहित होते तेव्हा, त्यांचे मित्र असलेल्या बोस यांनी त्यांना अनेक उपयुक्त सूचना केल्या होत्या. धुर्जटीप्रसाद असे म्हणत असत की, 'बोस जर शास्त्रज्ञ झाले नसते तर संगीतज्ञ झाले असते.'

बोस हे थोर विज्ञान प्रसारक होते. त्यांना प्रखरतेने असे वाटे की, सामान्य माणसाला त्यांच्याच भाषेत विज्ञान समजावून सांगणे ही त्यांची जबाबदारीच आहे. विज्ञान लोकप्रिय व्हावे म्हणून ते बंगालीत लेखन करत. 'बंगीय विज्ञान परिषदे'च्या स्थापनेत त्यांचा मोलाचा सहभाग होता. स्वदेशी भाषेतून विज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे आणि विज्ञान लोकप्रिय करणे हीच परिषदेची उद्दिष्टे होती. २५ जानेवारी १९४८ रोजी तिची स्थापना झाली. स्थापनेबाबतच्या परिपत्रकात म्हटले होते की, आपल्याला प्रत्येक टप्प्यावर विज्ञान हवे आहे. मात्र आपली शिक्षणप्रणाली आपल्याला त्याकरता तयार करत नाही. त्यामुळे आपल्या दैनंदिन आयुष्यात आपण विज्ञानाचा वापर करू शकत नाही. परकीय भाषेतून शिक्षण मिळत असल्याने तो एक प्रमुख अडथळा होता. आता तसे राहिलेले नाही. नव्या आशा आणि आकांक्षा निर्माण होत आहेत. स्वभाषेतून विज्ञान लोकप्रिय करणे, ही आपल्या वैज्ञानिकांची जबाबदारी आहे. त्यामुळे लोकांत निरोगी वैज्ञानिक विचारसरणी निर्माण होऊ शकेल. या प्रयासातील पहिली पायरी म्हणून 'बंगीय विज्ञान परिषदे'ची स्थापना केली जात आहे. प्रा. सत्येंद्रनाथ बोस यांच्या प्रेरक नेतृत्वामुळेच हे शक्य होत आहे. बंगालीत विज्ञान लोकप्रिय करण्यासाठी परिषदेने मासिक सुरू केले. 'ज्ञान ओ विज्ञान' असे त्याचे नाव होते. याचाच एक भाग म्हणून बोस हे स्नातकोत्तर विद्यार्थ्यांनाही बंगालीतून सापेक्षता शिकवू लागले होते.

४ फेब्रुवारी १९७४ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी बोस निवर्तले. एस. डी. चटर्जी लिहितात, 'प्रा. सत्येन बोस यांच्या निधनाने एका युगाचा अस्त झाला आहे. भारतात विज्ञान निर्माण करण्याऱ्या महान नेत्यांच्या युगाचा अस्त झाला आहे. आज कोलकात्यात बोस यांच्या नावाने एक संस्था आहे. सत्येंद्रनाथ राष्ट्रीय मूलभूत विज्ञानकेंद्र (नॅशनल सेंटर फॉर बेसिक सायन्सेस).

पूर्णांक फिरत (इंटिग्रल स्पिन) असलेल्या अण्वंतर्गत कणांना आपले नाव देणाऱ्या, मातृभाषेतून विज्ञान लोकप्रिय करण्यासाठी 'बंगीय विज्ञान परिषदे'ची स्थापना करणाऱ्या, असंख्य उदयोन्मुख शास्त्रज्ञांना प्रेरित करणाऱ्या, भारतमातेच्या या बुद्धिमान पुत्राने सैद्धांतिक भौतिकीच्या इतिहासात आपले नाव नोंदवलेले आहे. अजरामर केलेले आहे. आपल्याला त्यांच्या स्मृती सदैव प्रेरणा आणि उत्साह देत राहोत हीच प्रार्थना!

(मलपृष्ठ क्र. ३ वर)

आयुष्यात खूपदा बुद्धी जिंकते... हृदय हरतं... पण बुद्धी जिंकूनही हरलेली असते
आणि हृदय हरून देखील जिंकलेलं असतं!

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**१५ जून २०२० ते ३१ जानेवारी पर्यंतचे उपक्रम :-**

वर्ष २०२० सुरू झाले पण मार्च महिन्यापासून कोव्हीड १९ या विषाणूमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे २४ मार्च मध्यरात्री पासून टाळेबंदी लागू झाली.

शैक्षणिक वर्ष २०१९ - २०२० चे परीक्षा व निकाल प्रत्यक्ष न घेताच वर्ष संपले.

१५ जून पासून नवीन शैक्षणिक वर्ष २०२० - २०२१ सुरू झाले. या वर्षातील जून ते जानेवारी महिन्यातील उपक्रमांचा आढावा.

• १५ जून पासून दर सोमवारी वेबसाईटवर (www.vpmthane.org) आठवड्याचा आराखडा (Weekly Plan) पाठवला जात आहे. नर्सरी, ज्युनियर व सिनियरच्या मुलांना दर आठवड्यात इंग्रजी भाषा, गणित, परिसर अभ्यास व Art ADL PE खेळ या सर्वांबाबत माहिती देण्यात येते.

पालकांनी एखादी संकल्पना मुलांना कशी शिकवावी याचे मार्गदर्शन करण्यात येते.

• सर्व विषयांत शिकवलेल्या अभ्यासक्रमावर आधारित अशा कार्यपत्रिका (worksheet) १ जुलै पासून दर बुधवारी वेबसाईटवर पाठवल्या जातात. पालक मुलांकडून त्या सोडवून घेतात.

• **पालकांशी संवाद**

शिक्षकांनी नवीन तंत्रज्ञान अवगत करून संगणकावरून पालकांशी Zoom Meeting द्वारे संवाद साधला.

नर्सरी (९.३० वा) - १७ ऑगस्ट / १२ सप्टेंबर / २४ ऑक्टोबर / ९ जानेवारी.

ज्युनियर के. जी. (१० वा) - १७ ऑगस्ट / १२ सप्टेंबर / २४ ऑक्टोबर

सिनियर के. जी. (१०:३० वा) - २० ऑगस्ट / १२ सप्टेंबर / ३१ ऑक्टोबर

या वेळी पालकांशी संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन शिक्षकांनी केले.

• **व्हिडिओद्वारे शिक्षण -**

सप्टेंबर महिन्यात प्रथम गटानुसार शिक्षकांनी whatsapp group तयार केले.

शाळेतील अभ्यासक्रमा अंतर्गत विविध संकल्पना शिकवल्या जातात. शिक्षक व्हिडिओसारख्या आभासी माध्यमाचा उपयोग करून मुलांना शिकवतात.

शिक्षक दररोज एक / दोन अशा प्रकारे हे व्हिडिओ पालकांना whatsapp group वर पाठवतात. मुलांना शिकवण्यासाठी त्याचा पालकांना उपयोग होतो.

या व्हिडिओ द्वारे भाषा, गणित, परिसर अभ्यास इतकेच नव्हे तर ADL, हस्तकला (craft), विविध सणांची माहिती तसेच इंग्रजी अक्षरे व आकडे लिहिण्यासाठीची माहिती दिली जाते.

• **विद्यार्थ्यांशी संवाद -**

नर्सरी - ९ जानेवारी.

ज्युनियर के. जी. - १९ डिसेंबर

सिनियर के. जी. - १२ डिसेंबर

Zoom Meeting या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांशी शिक्षकांनी संवाद साधला. आमचे विद्यार्थी त्यांच्या शिक्षकांना व मित्र-मैत्रिणींना बघून खूपच आनंदून गेले. खूप दिवसांनी सर्व विद्यार्थ्यांशी साधलेला संवाद शिक्षकांना ताजेतवाना करून गेला.

• **राईम डे (सिनियर के. जी.)**

मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांनी विविध उपक्रमांत सहभागी होणे फार गरजेचे आहे.

सिनियरच्या विद्यार्थ्यांना कोणतीही एक राईम (इंग्रजी) हावभावांसकट म्हणून दाखवायची होती. १ ते १२ क्रमांकाच्या मुलांना २२ डिसेंबर रोजी.

१३ ते २५ क्रमांकाच्या मुलांना २४ डिसेंबर रोजी राईम म्हणायची होती. मुलांचा प्रतिसाद चांगला लाभला.

• **२४ डिसेंबर - नाताळ**

दरवर्षी मुलांबरोबर शाळेत नाताळ साजरा केला जातो. या वर्षी २४ डिसेंबरला मुलांना लाल रंगाचा वेष परिधान करायला सांगून राईम म्हणून झाल्यावर नाताळची माहिती शिक्षकांनी सांगितली. सांताक्लॉजचे गाणे (व्हिडियो) लावून सर्व मुलांनी त्यांच्या घरीच त्याचा आनंद लुटला. एकमेकांना नाताळच्या शुभेच्छा देऊन त्या दिवसाचे Online सत्र संपले.

• **बडबडगीत (गाणे) दिवस (ज्युनियर के . जी.)**

ज्युनियरच्या मुलांना कुठल्याही भाषेतील बडबडगीत हावभावांसहित म्हणायचे होते.

१ ते ११ क्रमांक २९ डिसेंबर रोजी

१२ ते २२ क्रमांक ३१ डिसेंबर रोजी

मुलांनी विविध भाषेतील बडबडगीते चालीत व आवाजातील चढ-उतार करून सुंदर सादर केली.

नर्सरीसाठी २९ जानेवारीला बडबडगीत सादरीकरण घेतले गेले. मुलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

• **सहज सोप्या पाककृती दिवस -**

सिनियर के. जी. - १२ जानेवारी २०२१ या आठवड्याच्या आराखड्यात (O) पाककृतीसाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची माहिती मुलांना देण्यात आली होती.

सिनियर के. जी.च्या मुलांनी **''मोनॅको बिस्कीट चाट?''** तयार केले.

शिक्षकांनी मुलांना हे चाट कसे तयार करायचे याचे प्रात्यक्षिक दाखवले. स्वत: केलेले चाट मुलांना फारच आवडले.

**ज्युनियर के. जी. - २१ जानेवारी २०२१.**

सोमवारी १८ जानेवारीच्या आठवड्याच्या आराखड्यात weekly plan मधे मुलांना तयारीची माहिती दिली गेली.

ज्युनियरच्या मुलांनी लिंबू सरबत तयार केले. स्वत: तयार केलेले सरबत मुलांना आवडले.

**पाककृतीचा उपक्रम घेतला त्या दिवशी शिक्षकांनी :-**

- अन्न वाया घालवू नये.

- ताटात वाढलेले सर्व संपवावे.

- जेवणानंतर भरपूर पाणी प्यावे.

- जेवणापूर्वी व जेवणानंतर हात स्वच्छ धुवावेत. या सर्व गोष्टी सांगितल्या.

**उजळणी सत्र - ज्युनियर के. जी.**

विषय : इंग्रजी (१४ जानेवारी व २८ जानेवारी)

१४ जानेवारी - ज्युनियर के. जी. - उजळणी विषय : भाषा.

१४ जानेवारी – एकमेकांना 'तिळगुळ घ्या गोड गोड बोला' म्हणून संक्रांत सणाच्या शुभेच्छा दिल्या.

या दिवशी मुलांना काळे कपडे घालायला सांगितले होते.

प्रार्थना व हजेरी झाल्यावर शिक्षकांनी भाषा (इंग्रजी) विषयातील 'अक्षरं ओळख' (Aa to Mm) याची उजळणी घेतली.

२८ जानेवारी – इंग्रजीतील (Nn to Zz) या अक्षरांची ओळख या विषयाचे उजळणी सत्र घेण्यात आले.

**उजळणी सत्र – सिनियर के. जी.**

विषय : भाषा (१९ जानेवारी २०२१) आणि विषय : गणित (२६ जानेवारी २०२१)

१९ जानेवारी – इंग्रजी भाषेतील 'Phonetic' या संकल्पनेची उजळणी घेतली गेली.

२६ जानेवारी – 'दशक एकक' या संकल्पनेची उजळणी शिक्षकांनी घेतली.

**प्रजासत्ताक दिवस :**

२१ जानेवारी – ज्युनियर के. जी.

२६ जानेवारी – सिनियर के. जी.

२६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो. मुलांना झेंड्याच्या तीन रंगांपैकी एका रंगाचे कपडे परिधान करायला सांगितले. शिक्षकांनी विविध राष्ट्रीय चिन्हांची माहिती देणारा (राष्ट्रीय पक्षी–मोर, राष्ट्रीय फळ–आंबा इ.) व्हिडिओ पाठवला. तसेच देशभक्तीवर गाणी सत्रात (Zoom Meeting) गायली. तिरंगा झेंडा दाखवून त्याचे महत्त्व सांगून त्याचा सदैव आदर करा असे शिक्षकांनी सांगितले.

यापुढेही मुलांबरोबर Zoom Meeting द्वारे अजून नावीन्यपूर्ण उपक्रम तसेच पालक सभा घेतल्या जातील.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

२६ जानेवारी २०२१, प्रजासत्ताक दिवस हा प्रत्येक भारतीयांसाठी महत्त्वपूर्ण दिवस.

हा दिवस सौ. ए. के. जोशी प्राथमिक विभागाच्या विद्यार्थी–शिक्षकांनी अत्यंत वेगळ्या पद्धतीने ऑनलाईन साजरा केला. त्यात इ. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना या दिवशी भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी केली व राज्यघटना म्हणजे काय हे सांगण्यात आले. प्रत्येक इयत्तेनुसार विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत, वेगवेगळ्या पावरपॉईंट सादरीकरणाद्वारे त्यांना भारतीय राष्ट्रीय नेत्यांची ओळख, आपल्या राष्ट्रध्वजाची माहिती, आपले राष्ट्रचिन्ह दाखविण्यात आले.

विद्यार्थ्यांनी विविध स्तरावर कागदी झेंडे बनवून स्वच्छतेचे महत्त्व सांगून, प्रश्नमंजुषेद्वारे, देशभक्तीपर गीत यातून राष्ट्रभावना विद्यार्थ्यांमध्ये जागृत करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

त्यात इ. ३ रीत शिकत असलेला कु. निशांत कापडणे याने कॅसिओ व इ. ४ थीत शिकत असलेला कु. सोहम आनंद बेडेकर याने सितार वाजवून राष्ट्रगीताचे सादरीकरण केले.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**१. शालान्त परीक्षा निकाल – मार्च २०२०**

एकूण विद्यार्थी : १२९

उत्तीर्ण : १२९

% : १००%

विशेष प्रावीण्यासह

७५% आणि वरील विद्यार्थी : ११६

६० – ७४ (प्रथम श्रेणी) : १३

एकूण : १२९

**२. शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी २०२०**

| इयत्ता | एकूण विद्यार्थी | शिष्यवृत्तीधारक |
|---|---|---|
| ५ वी | ६१ | २३ |
| ८ वी | ५८ | ३० |

**३. राज्यपुरस्कार प्राप्त विद्यार्थी : २०२०**

**वीरबालक (स्काऊट)**

१. हर्षल पेडणेकर
२. दुर्वेश खोपकर
३. सोहम कदम
४. ओम कुलकर्णी
५. सार्थक कुलकर्णी
६. पार्थ वैशंपायन
७. जय मगर
८. जय मोहिले
९. द्विज डोंगा
१०. वेदांत साळुंखे
११. सुमेध करे

**वीरबालिका (गाईड्स )**

१. अबोली शिंदे
२. ईश्वरी बोरकर
३. सारा कुलकर्णी
४. अदिती इनामदार
५. वेदश्री फडके
६. आर्या पेवेकर
७. शमिता लोखंडे
८. स्वरा बौव्वा
९. वरदा ढापरे

**४. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गणित परीक्षा – २०२०**

| इयत्ता | नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | अर्चित बंधू | ८६ |
| ५ वी | महिका सत्रा | ८६ |
| ६ वी | आदित्य खानजोडे | ८६ |
| ७ वी | गिरीश सुर्वे | ९२ |
| ८ वी | गौरांगी पाटील | ८५ |

**५. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ संस्कृत परीक्षा २०२०**

| इयत्ता | नाव | गुण |
|---|---|---|
| ८ वी | निहारिका मोरे | ८९ |
| ९ वी | ईश्वरी बोरकर | ८२ (संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण) |

**६. IPM मेगा फायनल परीक्षेत पात्र झालेले विद्यार्थी**

१. पेंडसे यशोधन
२. देसाई चिन्मय
३. खानजोडे आदित्य
४. गोगटे विराज
५. सहस्रबुद्धे गौतमी
६. साठे मानस
७. पेडणेकर हर्षल

**७. विज्ञानातील प्रयोगशीलता जागतिक स्तरावरील विज्ञान प्रदर्शनी म्हणजेच International Science and Invention fair 2020.**

जकार्ता, इंडोनेशिया येथे इयत्ता ८वीच्या विद्यार्थिनी कुमारी अमृता बापट आणि कुमारी गायत्री बेडेकर यांनी त्यांचा 'Muscles generate power' प्रयोग online सादर केला.

८. रेवती सायन्स फाऊंडेशन जुनिअर्स २०२१ आंध्रप्रदेश येथे कुमारी अमृता बापट आणि कुमारी गायत्री बेडेकर या विद्यार्थीनींनी आपला विज्ञानातील "Muscles generate power" प्रयोग online सादर करून प्रशस्तिपत्रक मिळविले.

९. दीपक साबळे यांनी शाळेत नौदल विभाग सुरू करण्या संदर्भात नौदलविषयी माहिती देऊन ८वीच्या पालकांना आणि विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले.

१०. ८ जानेवारी २०२१ रोजी ८ वी ९ वीच्या विद्यार्थ्यांना Sr. PSI बाळकृष्ण वाघ यांनी सायबर Cyber Crime संदर्भात मुलांना मार्गदर्शन केले.

**११. शिक्षकदिन – प्रजासत्ताकदिन**

१९२०–२१ वर्ष आपल्या सगळ्यांसाठीच खूप कठीण आहे, पण हे वर्ष आपल्याला बरेच काही शिकवूनही गेले, त्यातील एक भाग म्हणजे ऑनलाईन शाळा. पण मुलांमधील कलागुणांना व्यासपीठ देणंही आवश्यक होते, म्हणून सौ. ए. जोशी शाळेतील ५वी ते ८ वीच्या मुलांसाठी शिक्षक दिन (५ सप्टेंबर) आणि प्रजासत्ताक दिन (२६जानेवारी) ऑनलाईन साजरे केले होते.

शिक्षकदिना निमित्ताने मुलांना 'माझी शाळा' हा व्हिडीओ दाखवला गेला ज्यात शाळेच्या मनातील मुलांबद्दलचे विचार व्यक्त केले होते. तसेच मुलांनीही भाषण, गाणे, कविता, ग्रीटिंग कार्ड इत्यादी गोष्टी सादर केल्या.

त्याचप्रमाणे प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी इयत्ता ८ वीच्या मुलांनी आपल्याला माहीत नसलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना म्हणजे अनामवीरांना आदरांजली वाहिली ज्यात कविता, व्हिडीओ, भाषण, देशभक्तीपर गाणी अशा अनेक गोष्टींचा समावेश होता, जो इयत्ता ५ वी ते ८ वीच्या मुलांना ऑनलाईन दाखवला गेला. त्याचबरोबर ५ वी ते ८ वीच्या मुलांनी आपापल्या वर्गात त्यांचे देशावरील प्रेम आणि आदर व्यक्त केला.

अशा प्रकारे ह्या वर्षीसुद्धा सौ. ए. के. जोशी शाळेतील मुलांना रोजच्या शिक्षणाबरोबरच आपले अंगभूत कलागुण सादर करता आले.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**जोशी–बेडेकर महाविद्यालयाच्या रिसर्च कमिटीने आयोजित केलेल्या ''रिसर्च मेथोडोलॉजी अँड अकॅडमिक रायटिंग'' या संशोधन अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन**

जोशी–बेडेकर महाविद्यालयाच्या रिसर्च कमिटीने आयोजित केलेल्या ''रिसर्च मेथोडोलॉजी अँड अकॅडमिक रायटिंग'' या संशोधन अभ्यासक्रमाचा उद्‌घाटन कार्यक्रम दिनांक १९ जानेवारी २०२१ रोजी संपन्न झाला. हा अभ्यासक्रम १२ क्रेडिट पॉईंट हा असून सहा महिने चालणारा आहे.

या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजेश खरात व सह अधिष्ठाता डॉ. मंजिरी कामत व प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांची उपस्थिती लाभली.

रिसर्च कमिटीच्या प्रमुख डॉ. जयश्री सिंह यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या व मुंबई विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेच्या

सह-अधिष्ठाता डॉ. सुचित्रा नाईक यांनी संशोधन क्षेत्रात आमूलाग्र बदलाचे सूतोवाच केले. संशोधनामध्ये भारतातील दुर्लक्षित विषयांवर अधिकाधिक संशोधन व्हावे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

या उद्घाटन सत्रात डॉ. राजेश खरात यांनी महाभारतातील अर्जुनाचा संदर्भ देत, अर्जुनाला ज्याप्रमाणे पक्ष्याचा एकच डोळा दिसत होता त्याप्रमाणे संशोधक व विद्यार्थ्याला आपला संशोधनाचा विषय तेवढ्याच तन्मयतेने दिसला पाहिजे असे मत व्यक्त केले. मुंबई विद्यापीठामध्ये संशोधन करण्यासाठी संशोधकांना मार्गदर्शक अशी नियमावली देण्यात येण्याचे त्यांनी सांगितले. या नियमावलीचा सर्व संशोधकांना त्यांच्या संशोधनात नक्कीच फायदा होईल असे ते म्हणाले.

डॉ. मंजिरी कामत यांनी याप्रसंगी आपले संशोधन विद्यार्थी व सर्वसामान्य जनतेला कळणाऱ्या व रुचणाऱ्या भाषेत संशोधकांनी लिहिण्याची गरज आहे असे मत व्यक्त केले. संशोधन क्षेत्रामध्ये नैतिकता अत्यंत महत्त्वाची असून वाङ्मयचौर्याला आळा घालण्यासाठी संशोधनाच्या अभ्यासक्रमामध्ये या विषयांचा समावेश करावा असेही त्या म्हणाल्या. उद्घाटन सत्रानंतर डॉ. मीनल कातरणीकर यांचे महाविद्यालयाच्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल नारायण बारसे, तसेच विद्यार्थी, विभाग प्रमुख, प्राध्यापक व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. झरणा तोलानी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी ६० विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला.

**नैसर्गिक सं-साधन लेखा ही काळाची गरज - सुरेश प्रभू**

ठाण्याच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात ''वित्त, लेख कर व अंकेक्षणातील नवे विचारप्रवाह'' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या लेखाशास्त्र विभागाने आयसीएआयच्या डब्ल्यूआयआरसी ठाणे शाखेच्या सहकार्याने आणि भारतीय लेखा संघटना-ठाणे शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ''वित्त, लेख कर व अंकेक्षणातील नवे विचारप्रवाह'' या विषयावर १७ वी एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद शनिवार दिनांक १६ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ९ वाजेपासून आभासी प्लॅटफॉर्म यूट्यूबच्या साहाय्याने घेतली गेली. माजी केंद्रीय मंत्री व राज्यसभा सदस्य सुरेश प्रभू व आयसीएआयचे उपाध्यक्ष निहार जम्बुसरीया प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी व्यासपीठावर विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक व महाविद्यालयाचे लेखाशास्त्र विभाग प्रमुख सीए योगेश प्रसादे उपस्थित होते.

महाविद्यालयाने 'प्रज्वलितो ज्ञानमय प्रदीप:' ह्या आपल्या परंपरेने दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन करून परिषदेची सुरुवात केली. कोविड -१९ (साथीचा रोग) सर्व देशभर किंबहुना जगभर पसरलेला असल्याने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर स्थितीचा शैक्षणिक ज्ञानदानावर परिणाम होऊ नये म्हणून शैक्षणिक मेळाव्यासाठी आभासी प्लॅटफॉर्म निवडले होते.

परिषदेचे उद्घाटन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी केले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्याकरिता शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले

की, 'अकाउंट्स आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग तर आहेच पण आपलं संपूर्ण आयुष्य हे केवळ अंकांपुरते मर्यादित न ठेवता, आपण एकंदरीत ह्या शैक्षणिक प्रक्रियेतून समाजात आणि पर्यायाने देशाच्या विकासात आपलं योगदान कसं देऊ शकू ह्याचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे.' नवीन तंत्रज्ञानाचा विशुद्ध वापर करावा असा संदेश त्यांनी ह्या प्रसंगी विद्यार्थ्यांना दिला.

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी वैदिक साहित्याचा आणि उपनिषदांचा संदर्भ दिला. त्यांनी आयसीएआयचे ब्रीदवाक्य 'या एष सुप्तेषु जागर्ति'चा संदर्भ देत लेखा परीक्षणातील सजगतेचे महत्त्व स्पष्ट केले; तसेच कायद्याच्या मर्यादा आणि त्या पाळण्याची गरज ह्या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्वांनी या शैक्षणिक मेजवानीचा आनंद घ्यावा असे आवाहन केले.

प्रमुख अतिथी – मा. सुरेश प्रभू (खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री) यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले. या प्रसंगी नैसर्गिक सं-साधन लेखा काळाची गरज Natural resource Accounting बद्दल त्यांनी माहिती दिली. त्यासोबत ऑडिटरची जबाबदारी, सरकारी धोरणे आणि त्यासोबत निष्पक्ष व योग्य लेखापरीक्षण यावर त्यांनी भर दिला.

आजच्या जगात ई-कॉमर्स, जी -२० चे महत्त्व व त्याचसोबत डायरेक्ट तथा इनडायरेक्ट टॅक्स यांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

या परिषदेचे प्रमुख पाहुणे इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष सीए निहार जंबुसारिया विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाले की, 'तंत्रज्ञान आता बऱ्याच भागात मानवी संसाधनांची जागा घेत आहे, म्हणून मानवी आयुष्य अधिक अर्थपूर्ण बनवण्यासाठी आम्ही या तंत्रज्ञानाला कशा प्रकारे स्वीकारू शकतो हे पाहणे गरजेचे आहे. सर्वांना या साथीच्या रोगात तंत्रज्ञानाचे महत्त्व कळले आहे.'

बीजभाषण करण्यासाठी मुख्य वक्ते म्हणून उपस्थित असलेले सीए शिवाजी झावरे ओशियनियन स्टँडर्ड सेट्टर्स ग्रुपचे अध्यक्ष असून, युनिक डॉक्युमेंटेशन आयडेंटिफिकेशन नंबरचे संशोधक असून सीए शिक्षण, प्रशासन आणि सामाजिक कार्य यातील जीवनगौरव पुरस्कार प्राप्त आहेत. त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जीएएपी (GAAP) आणि मूलभूत लेखा गृहितकांवर (Fundamental assumptions) भर देताना त्यांनी नमूद केले की, अकाउंटिंग केवळ वाणिज्य शाखेत महत्त्वाचे नाही तर ही एक प्रभावी व्यवसाय संप्रेषण भाषा आहे; जी संबंधित संस्थेच्या विविध आर्थिक स्थितींबद्दल माहिती देते, त्यांनी प्रेक्षकांना एक मोलाचा संदेशही दिला. ते म्हणाले की, 'तंत्रज्ञानाच्या काळात प्रत्येक शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी learn, delearn आणि पुन्हा relearn ह्याना आत्मसात केले पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांना technical know how?, practical do how?, marketing know how? हे तीन प्रश्न विचारून self analysis करण्यास सांगितले. याप्रसंगी वेस्टर्न इंडिया रीजनल कौन्सिलचे अध्यक्ष ललित बजाज यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. परिषदेचे संयोजक प्रा. सी.ए. प्रसादे यांनी नमूद केले आहे की, 'ही परिषद लेखा क्षेत्रातील नव्या एबीसीडीवर प्रकाश टाकेल, जिथे A - artificial intelligence कृत्रिम बुद्धिमत्ता, B - ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी, C - सायबर सिक्युरिटी आणि D - डेटा ॲनालिटिक्स यांचा समवेश आहे.'

परिषदेत मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, 'सीए परीक्षेचा बदलता प्रकार पाहता अधिक कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना संबंधित क्षेत्राशी संबंधित तंत्रज्ञानाशी अधिक परिचित होण्यासाठी, सक्षम होण्यासाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्व

विकासावर लक्ष केंद्रित करत बदलत केले पाहिजेत.'

याप्रसंगी आयएए ठाणे शाखेचे सचिव डॉ. निशिकांत झा यांनी आयएएच्या फेलोशिप प्रोग्रामसह विविध कार्यक्रमांची माहिती दिली आणि भारतीय लेखा संघटना विविध तसेच करिअरला चालना देणारे व्यासपीठ कसे पुरवले जाते हे सांगितले.

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी परिषदेत सादर होणाऱ्या शोध-निबंधाच्या सारांश पुस्तकाचे प्रकाशन केले. याप्रसंगी उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांनी पुढील वर्षी जानेवारी २०२२ मध्ये महाविद्यालयाच्यावतीने होणाऱ्या ''महिलांचे राजकीय नेतृत्व : जागतिक ते स्थानिक - आव्हाने आणि संधी'' या विषयावर १८ व्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेची घोषणा केली. सीए मधुरा जोशी यांनी उद्‌घाटन सोहळ्याचे आभार प्रदर्शन केले.

उद्‌घाटन समारंभाची सांगता होताच तीन महत्त्वपूर्ण सत्रांना सुरुवात झाली.

प्रथम सत्रामध्ये ''वित्त व अंकेक्षण क्षेत्रातील सद्यस्थिती'' या विषयावर गोदरेज एग्रोवेटचे प्रमुख वित्त अधिकारी सीए वरदराज सुब्रमण्यम व सीए मंगेश किन्नरे यांचे भाषण झाले; दुसऱ्या सत्रामध्ये 'शेअर क्षेत्राचे तांत्रिक आकलन' या विषयावर सीए रचना रानडे व सीए कमलेश साबू यांचे व्याख्यान झाले. परिषदेच्या तिसऱ्या सत्रात मुकेश इसरानी व प्रा. अपर्णा धर्माधिकारी यांचे भाषण झाले.

परिषदेत ''लेखा व अंकेक्षण क्षेत्रातील नवे विचार प्रवाह'' या विषयावर तज्ज्ञ अभ्यासकांचा परिसंवाद झाला. त्यामध्ये मेकेसन युरोपचे सीए केदार जगताप, सीए सौरभ पाशिने (general manager control and compliance), नयारा एनेर्जी लिमिटेडचे श्रीनिवासन पार्थसारथी, सीए कला कृष्णमूर्ती (coo and director Enam asset management , Singapore), इनग्राम मायक्रो इंडिया लिमिटेड प्रमुख वित्त अधिकारी सीए प्रभाकर अय्यर यांचा सहभाग होता. सीए मझहर लोखंडवाला हे या सत्राचे अध्यक्ष होते. ह्या परिसंवादामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता कंट्रोल ऑटोमेशन यांसारख्या मुद्यांवर चर्चा केली गेली.

पुढील महत्त्वाच्या टप्प्यावर सीए आयपीएस सचिन पाटील यांनी विद्यार्थ्यांना ''सायबर क्राईम, सायबर सेक्युरिटी'' ह्या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले व त्यातील बारकावे, विविध प्रकार आणि पद्धतींची माहिती दिली.

या परिषदेमध्ये तज्ज्ञ अभ्यासक संशोधक व विद्यार्थी यांचे शोधनिबंध यांचा देखील समावेश होता. परिषदेचा समारोप सत्रात भुटानचे रजनीश रत्ना यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले असून, या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजनात इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया या संस्थेच्या ठाणे शाखेचे अध्यक्ष सीए सुरेन ठाकूरदेसाई यांचे सहाय्य प्राप्त झाले आहे.

वित्त, लेखा व कर आकारणी मध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, ब्लॉक चेन, सायबर सिक्युरिटी, डेटा अनलिटिक्स इत्यादी नवीन तंत्रज्ञानाचा सध्या उपयोग होत आहे. नवीन उद्योगधंद्यांच्या स्थापनेपासून कार्य विस्तारामध्ये वित्त लेखा व कर आकारणी क्षेत्रामध्ये कॉम्प्युटर ऑटोमेशन व समाज माध्यमांचा वाढता वापर इत्यादी नवीन तंत्रज्ञानाचा जोमाने वापर होत आहे. कोरोनोत्तर काळामध्ये होणाऱ्या या नव्या बदलांना सामोरे जाण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ, अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी व सुबुद्ध नागरिक या सर्वांनी एकत्र येऊन विचारमंथन करण्यासाठी

या परिषदेचे आयोजन करण्यात आले असे मत महाविद्यालयाच्या लेखा विभागाचे प्रमुख सीए योगेश प्रसादे यांनी व्यक्त केले.

या परिषदेत अर्थ विषयक चर्चा व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसाधारण नागरिकांचे जीवन अधिक सुखकर करण्यासाठी काय करता येईल यावर विचार मंथन झाले असे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी व्यक्त केला. प्रा. नीतिन वाडविंदे यांनी आभार प्रदर्शन केले. परिषदेच्या यशस्वीतेसाठी लेखा विभाग प्रमुख सीए योगेश प्रसादे, प्रा. मधुरा जोशी, प्रा. नीतिन वाडविंडे, प्रा. राऊत यांनी मोलाचे सहकार्य केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील व ग्रंथपाल नारायण बारसे यांनी सहकार्य केले. डॉ. अर्चना नायर व सुजा रॉय अब्राहम यांनी परिषदेतील सर्व सत्रांचे सूत्रसंचालन केले. परिषदेची सांगता महाविद्यालयाच्या परंपरेनुसार पसायदान म्हणून झाली. या आंतरराष्ट्रीय परिषदेला यु-ट्यूब या आभासी माध्यमातून असंख्य विद्यार्थी प्राध्यापक संशोधक व सामान्य नागरिकांनी देखील हजेरी लावली.

**रोहित पवार हा विद्यार्थी भारताच्या ७२ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीमधील महाराष्ट्राचा चित्ररथ सादर करण्यासाठी निवडला गेला.**



जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या जनसंज्ञापन विभागात तृतीय वर्षात शिकत असलेला रोहित पवार हा विद्यार्थी भारताच्या ७२ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीमधील महाराष्ट्राचा चित्ररथ सादर करण्यासाठी निवडला गेला.

केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयामार्फत नवी दिल्ली येथे चित्ररथाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी अर्थात २०२१ च्या चित्ररथ संचलनात महाराष्ट्र राज्याची निवड करण्यात आली होती. महाराष्ट्राची संत परंपरा या विषयावर यंदाचा चित्ररथ साकारण्यात आला होता. या चित्ररथावर नृत्य सादरीकरणासाठी जोशी बेडेकर महाविद्यालयाचा विद्यार्थी रोहित कृष्णा पवार यांची दिल्ली येथे कलाकार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

महाराष्ट्राच्या चित्ररथात यावेळी वारकरी संत परंपरा या विषयावर नयनरम्य असा देखावा सादर करण्यात आला.

महाविद्यालयाच्या व एकूणच विद्या प्रसारक मंडळ या संस्थेच्या अभिमानाचा हा विषय आहे.

**जोशी-बेडेकर महाविद्यालयात चित्रपट रसास्वाद अभ्यासक्रमाचे उद्घाटन**

**सुजाण प्रेक्षक होण्यासाठी चित्रपट रसास्वाद अभ्यासक्रमांची गरज : ज्येष्ठ सिने-अभ्यासक सुधीर नांदगावकर**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी-बेडेकर कॉलेज राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय पुणे व फेडरेशन फिल्म सोसायटी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दहा दिवसांच्या चित्रपट रसास्वाद अभ्यासक्रमाचे उद्घाटन दिनांक ३ फेब्रुवारी रोजी आभासी माध्यमातून करण्यात आले. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक व फेडरेशनचे उपाध्यक्ष सुधीर नांदगावकर, तसेच पुण्याच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जोशी-बेडेकर महाविद्यालय

फिल्म सोसायटीचे समन्वयक डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी चित्रपट रसास्वाद अभ्यासक्रमाची भूमिका विशद केली.

'चित्रपट पाहण्याचे एक कौशल्य असते आणि ते उत्तमोत्तम चित्रपट पाहून समजते. चित्रपटाची रचना त्या चित्रपटाचे आस्था विषय समजून घेऊन ते शोधायला लागते. त्यानंतरच चित्रपटाचे कलातत्त्व उमगते. एखादा रसिकप्रिय चित्रपट दीर्घकाळ स्मरणात रेंगाळतो आणि मग त्याच्या रचनेतील कारणमीमांसा समजल्यानंतर चित्रपट कलेतील तंत्रकुशल गुणवत्तेमागची प्रतिभा उमगते. चित्रपट समजावून घेण्याच्या या गोष्टींमुळेच चित्रपट रसास्वादाचे महत्त्व अधोरेखित होते' असे मत सुधीर नांदगावकर यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम यांनी, 'रसास्वाद अभ्यासक्रम हे चित्रपट कलेविषयी सजग भान देणारे आहेत; अशा अभ्यासक्रमांमुळे आपली चित्रपट आस्वादाची साधने तयार करून दृष्य-ध्वनी आणि त्याची जोडणी यांची गुंफण करून चित्रपट रसास्वादातून चित्रपट समीक्षकाकडे जाण्याचा मार्ग प्रशस्त होतो' असे मत मांडले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत चित्रपट रसास्वादाची तरुण पिढीला असलेली गरज अधोरेखित केली. तसेच प्रा. शिंदे म्हणाले की, 'महाविद्यालयाची फिल्म सोसायटी ही महाराष्ट्रातील पहिली कॅम्पस फिल्म सोसायटी आहे. २००७ मध्ये प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल आणि विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते फिल्म सोसायटीचे उद्घाटन झाले होते.'

चित्रपट रसास्वाद अभ्यासक्रम विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

सदर कोर्स हा ऑनलाइन माध्यमातून होणार असून या शिबिरात समर नखाते (चित्रपट विश्लेषक), गणेश मतकरी (चित्रपट समीक्षक), विकास देसाई (चित्रपट दिग्दर्शक व विश्लेषक), डॉ. श्यामला वनारसे (ज्येष्ठ चित्रपट विश्लेषक), सतीश जकातदार व अभिजीत रणदिवे अशा दिग्गजांचे मार्गदर्शन लाभले.

उद्घाटन कार्यक्रमाला प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, जनसंज्ञापन विभागाचे समन्वयक व उपप्राचार्य डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे व विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फिल्म सोसायटीचे समन्वयक डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले.

**जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. सुचित्रा ए. नाईक यांना समाजसेवा, समुपदेशन व शिक्षण क्षेत्रात अतुलनीय योगदानाबद्दल महाराष्ट्र राज्यस्तरीय प्रतिष्ठित 'सावित्री पुरस्कार' प्राप्त**



विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. सुचित्रा ए. नाईक यांना समाजसेवा, समुपदेशन व शिक्षण क्षेत्रात अतुलनीय योगदानाबद्दल महाराष्ट्र राज्यस्तरीय प्रतिष्ठित सावित्री

पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

हा पुरस्कार डीबीजे कॉलेज, चिपळूण, रत्नागिरीमधील इतिहास विभागप्रमुख डॉ. ज्ञानोबा कदम यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय विद्यार्थी परिषद नावाच्या संस्थेमार्फत देण्यात आला आहे.

**संशोधन कार्यपद्धती व शैक्षणिक लेखनावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन**

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या संशोधन समितीने संशोधन अभ्यासकांसाठी 'रिसर्च मेथडॉलॉजी अॅन्ड अॅकॅडमिक राइटिंग' या विषयावर प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला होता. हा कोर्स १२ क्रेडिट पॉईंट्सचा असून ६ महिन्यांपर्यंत सुरू राहणार असून, या प्रमाणपत्र कोर्सचा उद्घाटन सोहळा १ जानेवारी, २०२१ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मुंबई विद्यापीठाचे राजेश खरात, ह्युमॅनिटी, डीन, आणि मुंबई विद्यापीठाच्या डॉ. मंजिरी कामथ, ह्युमॅनिटी, असोसिएट डीन हे होते. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा ए. नाईक यांनीही या कार्यक्रमात आपले मोलाचे मार्गदर्शन दिले.

संशोधन समितीच्या अध्यक्षा डॉ. जयश्री सिंह या देखील यावेळी उपस्थित होत्या. तसेच प्रसंगी संशोधन अभ्यासकांसाठी डॉ. मीनल कतरणीकर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

डॉ. झरना तोलानी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे आणि विभाग प्रमुख, शिक्षक, संशोधन अभ्यासक व विद्यार्थी उपस्थित होते. जवळपास ६० संशोधकांनी या कार्यक्रमास हजेरी लावली.

**व्यवस्थापकीय निर्णयासाठी मूलभूत लेखा समजून घेण्यासाठी ब्रीज कोर्सचे आयोजन**

बी. व्ही. ओ. सी विभाग इन सेल्स अॅण्ड मार्केटींग व्यवस्थापकीय निर्णयांसाठी बेसिक अकाऊंटिंग समजून घेण्यासाठी 'ब्रीज कोर्स' आयोजित करण्यात आला होता. कला, वाणिज्य आणि सेल्फ फायनान्स प्रवाहातील पदवीधर विद्यार्थ्यांसाठी हा कोर्स सुरू करण्यात आला होता.

व्यवस्थापकीय निर्णय घेण्यासाठी आवश्यक असणारी मूलभूत लेखाविषयक अटींविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे, तसेच लेखांकन मूलभूत कौशल्ये सुधारणे आणि अकाउंटन्सी आधारित विषयांची अधिक चांगली समज देणे हे या कोर्सचे मुख्य उद्दिष्ट होते.

या कोर्सचा कालावधी ६ दिवस इतका असून २५ जानेवारी, २०२१ रोजी या कोर्सचा प्रारंभ करण्यात आला. हा कोर्स ऑनलाईन पद्धतीने संध्याकाळी ४:०० ते ५:३० या वेळात घेण्यात आला. तसेच केवळ ३०० रुपये ही या कोर्सची फी होती. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा ए. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कोर्स पार पाडण्यात आला.

**डॉ. नीलम शेख, बीएएफ समन्वयक यांना बेस्ट अध्यापक पुरस्कार २०२०**

ग्लोबल मल्टीडिप्सीप्लिनरी रिसर्च कॅडमिक फाऊंडेशन (जीएमआरएएफ) 'बेस्ट अध्यापक पुरस्कार २०२०' अध्यक्ष डॉ. नीलम शेख, बीएएफ समन्वयक, (स्पेशलायझेशन क्षेत्र : लेखाशास्त्र), यांना २६ डिसेंबर, २०२० रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अध्यापन, प्रशासन, प्रकाशन किंवा क्षेत्र उल्लेखनीय योगदानाची स्तुती आणि आत्मविश्वास, निराकरण आणि विकास आणि शैक्षणिक आणि विद्यार्थी समुदायासाठी समर्पित करण्यात येतो.

### ''नागरिकांमध्ये दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि अनैतिक विपणन पद्धतींविषयी जागरुकता'' या विषयावर सत्राचे आयोजन

महाविद्यालयाद्वारे विभागीय सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमाचा एक भाग म्हणून बी. व्ही. ओ. सी. आय. एन. विक्री व विपणन विभाग आणि मुंबई ग्राहक पंचायतीच्या संयुक्त विद्यमाने, 'नागरिकांमध्ये दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि अनैतिक विपणन पद्धतींविषयी जागरुकता' या विषयावर २३ जानेवारी, २०२१ रोजी सायंकाळी ५:३० वाजता झूम या दुव्याद्वारे अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. अर्चना सबनीस, अध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत (एमजीपी) मुलुंड विभाग, या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या होत्या. त्या डव्हर्टायझिंग स्टँडर्ड काउन्सिल ऑफ इंडिया, मेडिको एल-लीगल कन्सल्टंट, एमएएचए रेरा कॉन्सिलिएटरच्या एमजीपीचे प्रतिनिधित्व करत आहेत.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा ए. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत उत्तमरित्या पार पडला.

### बीकॉम विभाग (लेखा व वित्त), भारतीय लेखा संघटना, ठाणे शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योग संशोधनवर मूल्यवर्धित कोर्सचे आयोजन

महाविद्यालयात बी.कॉम विभाग (लेखा व वित्त), भारतीय लेखा संघटना, ठाणे शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ''उद्योग संशोधन (मूल्य प्रकल्प आणि अहवाल) वर मूल्यवर्धित कोर्स''चे आयोजन करण्यात आले होते.

दि. २८ जानेवारी २०२१ ते १६ फेब्रुवारी, २०२१ असा या कोर्सचा २० दिवसांचा कालावधी असून, सकाळी ११:३० ते दुपारी १:३० य वेळात हा अभ्यासक्रम पार पाडण्यात आला. तसेच कोर्सचे शुल्क केवळ ८०० रुपये इतके होते.

### 'इतिहास विभागाद्वारे ''मुंबई परिसराचा ज्ञात व अज्ञात इतिहास'' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे तृतीय वर्ष इतिहासाच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी सायंकाळी ०५:३० वाजता एक विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

मुंबई परिसराचा ज्ञात व अज्ञात इतिहास या विषयावर हे व्याख्यान असून डॉ. श्रीदत्त राऊत हे या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते म्हणून हजर होते. तसेच सदर व्याख्यान झूम या दुव्याद्वारे घेण्यात आले.

डॉ. राऊत यांनी मुंबईच्या इतिहासाच्या काही अनपेक्षित आणि थोड्या ज्ञात पैलूंवर तंतोतंत लक्ष केंद्रित केले. त्यांनी आजवर महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक आणि मध्य प्रदेशात १२ व्या ते चौदाव्या शतकापर्यंत राज्य केले. एकेकाळी मुंबई आणि दक्षिण महाराष्ट्रात राज्य करणारे शिलाहार राजवटीचे यादव वंश यांचे संदर्भ त्यांनी काढले. राऊत सरांनी स्थानिक भारतीय सत्ताधीश राजवंश व पोर्तुगीज व ब्रिटिश यांच्या आधिपत्याखाली बॉम्बे किल्ले, सायन किल्ल्याचे काही मनोरंजक छायाचित्र आणि ठाणे शहरावर थोडक्यात भाषण दिले. त्यांनी मुंबईच्या इतिहासाचा सुंदर आढावा घेतला. व्याख्यान प्रश्न-उत्तर सत्रानंतर घेण्यात आले ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रश्न विचारले आणि शहराच्या इतिहासाबद्दल अधिक जाणून घेण्यात रस दर्शविला.

प्रश्नोत्तराच्या सत्रानंतर डॉ. श्रीमती इंद्राणी रॉय यांनी आभार मानले आणि कार्यक्रमाचा समारोप झाला.

या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक तसेच समन्वयक, विविध विभागांचे प्रमुख आणि उपप्राचार्य डॉ. (सौ.) प्रियंवदा टोकेकर आणि डॉ. महेश पाटील उपस्थित होते. तसेच प्रा. डॉ. सुचित्रा ए. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत सुंदररित्या पार पडला.

**प्रजासत्ताक दिनानिमित्त ऑनलाईन पद्धतीने पार पाडण्यात आला ध्वजारोहणाचा कार्यक्रम**

२६ जानेवारी, २०२१ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाण्याच्या परिसरात ध्वजारोहण सोहळा पार पडला. शिक्षक, समन्वयक, तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी य सोहळ्यास उपस्थित राहावे असे सांगण्यात आले. तसेच या कार्यक्रमास व्यक्तिशः उपस्थित राहणे अत्यंत कठीण असल्यास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी या कार्यक्रमास ऑनलाईन उपस्थित राहू शकतात, असे देखील महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीद्वारे सांगण्यात आले.

**स्टुडंट्स फोरम समितीद्वारे ''डेटा गोपनीयता – ट्रेंड, मुद्दे आणि चिंता'' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन**

स्टुडंट्स फोरम ही महाविद्यालयाच्या स्थानिक समित्यांपैकी एक आहे जी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित आहे. २०२०-२०१२ या शैक्षणिक वर्षासाठी फोरमच्या उद्घाटनासाठी शनिवार, दिनांक ३०, जानेवारी २०२१ रोजी 'डेटा गोपनीयता – ट्रेंड, मुद्दे आणि चिंता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. ॲड. डॉ. अमितकुमार खातू, स्कीरॉन ग्रुप ऑफ कंपनीचे कायदेशीर सल्लागार हे या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते होते.

हे व्याख्यानाचा कालावधी सकाळी ११:३० ते दुपारी १:०० असा होता. शहीद दिनानिमित्त राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना श्रद्धांजली वाहून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. गुगल मीट या ऑनलाईन माध्यमाद्वारे हे व्याख्यान पार पाडण्यात आले.

या व्याख्यानात एकूण ३४ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रा. डॉ. सुचित्रा ए. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हे व्याख्यान पार पडले.

**बँकिंग विमा विभागाद्वारे ''विमा क्षेत्रातील अधिकाऱ्यांची भूमिका'' या विषयावर सत्राचे आयोजन**

महाविद्यालयाच्या बँकिंग विमा विभागाने ''विमा क्षेत्रातील अधिकाऱ्यांची भूमिका'' या विषयावर दि. २८ जानेवारी, २०२१ रोजी दुपारी २:०० वाजता व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सतीश भट्ट, अपॉइंटेड क्च्युअरी, जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (जीआयसी) हे या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते होते.

झूम आणि यू-ट्यूबच्या माध्यमातून प्रसारित झालेल्या सत्राचा एकूण एकूण ८२ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा ए. नाईक यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली हे व्याख्यान पार पडले.

**२०२१ बजेटचे थेट प्रक्षेपण**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे २०२१ बजेट भाषण सोमवार दि, १ फेब्रुवारी रोजी ११ वाजता सुरू होणार होते.

बँकिंग आणि विमा विभाग आणि वित्तीय बाजारपेठाने केंद्रीय अर्थसंकल्प २०२१ च्या भाषणाची थेट पडताळणी झूम लिंक मार्गे करण्यात आली होती.

**जोशी-बेडेकर महाविद्यालयात मेंटोरशिप वर्कशॉपचे आयोजन**

आयक्यूएसी, तत्त्वज्ञान विभाग आणि समुपदेशन कक्ष यांद्वारे दि. २ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी ९:३० ते दुपारी १:३० या वेळेत 'एक्सेल थ्रू सपोर्ट' या नावाने मार्गदर्शनपर व्हर्च्युअल कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेसाठी संसाधन व्यक्तींमध्ये डॉ. आनंद नाडकर्णी आणि डॉ. अनुराधा सोवनी यांचा समावेश

होता. कार्यशाळेचे सविस्तर वेळापत्रक पाठवले गेले होते. तसेच कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन माध्यमांचा वापर करण्यात आला. तसेच पदवी महाविद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी (अनुदानित तसेच सेल्फ फायनान्सिंग कोर्सेस) या कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा ए. नाईक यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा उत्तमरित्या पार पडली.

**डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला, पुष्प सतरावे निमित्त डॉ. अविनाश धर्माधिकारी यांच्या व्याख्यानाचे आयोजन**


विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय ठाणे, आयोजित डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला कार्यक्रम दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी ऑनलाईन स्वरूपात पार पडला. स्मृती व्याख्यानमालेचे हे सत्ताविसावे पुष्प होते. व्याख्यानमालेसाठी व्याख्याते म्हणून डॉ. अविनाश धर्माधिकारी (माजी सनदी अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व लेखक, संस्थापक- चाणक्य मंडळ) यांचे मोलाचे मार्गदर्शन सर्व शिक्षक वर्गाला आणि विद्यार्थी मित्रांना लाभले.

व्याख्यानाची सुरुवात सकाळी १० वाजून १५ मिनिटांनी झाली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या प्राध्यापिका मानसी जंगम यांनी केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक मॅडम यांनी कार्यक्रमाची रुपरेषा सांगत कार्यक्रमाची सुरुवात केली आणि वेळातवेळ काढून कार्यक्रमाला उपस्थित राहिलेले व्याख्याते डॉ. अविनाश धर्माधिकारी यांचे आभार देखील मानले. त्यानंतर मानसी जंगम मॅडम यांनी डॉ. अविनाश धर्माधिकारी यांची ओळख करून दिली. अविनाश धर्माधिकारी यांनी त्यांच्या व्याख्यानाची सुरुवात 'नमस्ते' या शब्दाने करत त्या शब्दाचं महत्त्व सांगितलं. त्यांनी एम्.पी.एस.सी. आणि यु.पी.एस.सी. सोबतच इतर क्षेत्रांतल्या परीक्षांविषयीसुद्धा माहिती दिली. प्रत्येक परीक्षांमध्ये असणारे साम्य आणि वेगळेपण त्यांनी सांगितले. एम्.पी.एस.सी. आणि यु.पी.एस.सी. या स्पर्धा परिक्षांच्या पूर्ण टप्प्यांची आणि गुणांची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. मुलाखतीच्या वेळी कशी उत्तरे द्यावी, आपल्या व्यक्तिमत्त्वाचे सादरीकरण कसे असावे आणि आत्मविश्वास याबद्दल त्यांनी सांगितले. मार्गदर्शन करताना त्यांनी इंग्रजीतील 'Jack of all Trades and Master of None' या प्रसिद्ध वाक्याचा उल्लेख केला आणि सोबतच सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री बाबा आमटे यांनी आधुनिक शिक्षणपद्धतीला अनुसरून त्यात केलेला सूक्ष्म बदल 'Jack of all Trades and Master of atlest One' याविषयी सांगितले आणि त्या वाक्याचा अर्थ त्यांनी असा सांगितला की, बाकीच्या विषयांचा माझा विस्तृत अभ्यास आहेच आणि मी माझ्या एका विषयातही तज्ज्ञ आहे. एम्.पी.एस.सी. आणि यु.पी.एस.सी. या परीक्षा का द्याव्या आणि त्यातून काय मिळतं यावर ते म्हणाले की, यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. आणि त्याचे पाच शब्द पंचशील असे आहेत की, पहिला शब्द म्हणजे प्रामाणिक आणि चांगल्या मार्गाने आलेले पैसे, दुसरा शब्द म्हणजे सुरक्षितता, तिसरा शब्द म्हणजे सन्मान, चौथा शब्द म्हणजे सत्ता आणि पाचवा म्हणजे देशसेवा. ते असंही म्हणाले की, जे काम हजारोंचा जनसमुदायही करू शकत नाही ते अधिकारी एका स्वाक्षरीवर करू शकतात इतकी त्या अधिकाऱ्याच्या पदाची ताकद असते. तुम्ही तुमच्या कामाने खूप काही करू शकता असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या शेवटी त्यांना प्रश्न विचारण्याची संधीदेखील विद्यार्थी आणि शिक्षकांना मिळाली.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व शिक्षक झूम ॲपद्वारे सहभागी झाले होते अणि सर्व विद्यार्थी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून जोडले गेले होते. तसेच या व्याख्यानासाठी महाविद्यालयाचा विद्यार्थी दिव्येश बापट याने तांत्रिक सहकार्य केले. या व्याख्यानाची सांगता पसायदानाने झाली.

**जोशी-बेडेकर महाविद्यालयात चित्रपट रसास्वाद अभ्यास कार्यशाळा संपन्न**

'सुजाण प्रेक्षक घडवण्यासाठी चित्रपट रसास्वाद अभ्यासक्रमांची गरज : ज्येष्ठ सिने-अभ्यासक सुधीर नांदगावकर'



विद्या प्रसारक मंडळाचे जोशी-बेडेकर कॉलेज, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय पुणे व फेडरेशन फिल्म सोसायटी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दहा दिवसांचा चित्रपट रसास्वाद अभ्यासक्रमाचे आयोजन दिनांक ३ ते १३ फेब्रुवारी दरम्यान आभासी माध्यमातून करण्यात आले. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक व फेडरेशनचे उपाध्यक्ष सुधीर नांदगावकर तसेच पुण्याच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम व अन्य सिने दिग्दर्शक व तज्ज्ञ उपस्थित होते. महाविद्यालयाच्या फिल्म सोसायटीचे समन्वयक डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी अभ्यासक्रमाच्या संयोजनाची जबाबदारी सांभाळली. एकूण ५० विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात सहभाग नोंदवला होता.

'चित्रपट पाहण्याचे एक कौशल्य असते आणि ते उत्तमोत्तम चित्रपट पाहून समजते. चित्रपटाची रचना त्या चित्रपटाचे आस्था विषय समजून घेऊन ते शोधायला लागते. त्यानंतरच चित्रपटाचे कलातत्त्व उमगते. एखादा रसिकप्रिय चित्रपट दीर्घकाळ स्मरणात रेंगाळतो आणि मग त्याच्या रचनेतील कारणमीमांसा समजल्यानंतर चित्रपट कलेतील तंत्रकुशलगुणवत्तेमागची प्रतिभा उमगते. चित्रपट समजावून घेण्याच्या या गोष्टींमुळेच चित्रपट रसास्वादाचे महत्त्व अधोरेखित होते' असे मत सुधीर नांदगावकर यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम यांनी, 'रसास्वाद अभ्यासक्रम हे चित्रपट कलेविषयी सजग भान देणारे आहेत; अशा अभ्यासक्रमांमुळे आपली चित्रपट आस्वादाची साधने तयार करून दृष्य-ध्वनी आणि त्याची जोडणी यांची गुंफण करून चित्रपट रसास्वादातून चित्रपट समीक्षेकडे जाण्याचा मार्ग प्रशस्त होतो' असे मत मांडले.

ऑनलाइन माध्यमातून संपन्न झालेल्या या अभ्यासक्रमात ज्येष्ठ चित्रपट समीक्षक समर नखाते यांनी 'चित्रपटातील दृश्यात्मकता' सिने तज्ज्ञ गणेश मतकरी यांनी 'समांतर सिनेमा', चित्रपट दिग्दर्शक व विश्लेषक विकास देसाई यांनी 'चित्रपटातील ध्वनी संयोजन', ज्येष्ठ चित्रपट विश्लेषक डॉ. श्यामला वनारसे यांनी 'चित्रपटाची भाषा' ज्येष्ठ सिने तज्ज्ञ अभिजीत रणदिवे यांनी 'जागतिक सिनेमातील नवे प्रवाह', पुण्याच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम यांनी चित्रपट संवर्धन या विषयांवर मार्गदर्शन केले. जोशी बेडेकर कॅम्पस फिल्म सोसायटीचे समन्वयक डॉ प्रशांत धर्माधिकारी यांनी 'फिल्म सोसायटी चळवळ व सिनेमा संस्कृती' या विषयावर व्याख्यान दिले.

या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे रोजच्या व्याख्यानांसोबत एक अभिरुची संपन्न असा जागतिक

दर्जाचा चित्रपट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला. त्यामध्ये सत्यजित रे यांनी दिग्दर्शित केलेला प्रसिद्ध असा 'पाथेर पांचाली', तसेच जागतिक चित्रपट बायसिकल थिव्हज चिल्ड्रन ऑफ हेवन, नो मॅन्स लँड, मंथन, मिरच मसाला, द मॅन हू न्यू इन्फिनिटी इत्यादी चित्रपटांचा समावेश होता. चित्रपटानंतर त्यातील सौंदर्यस्थळांवर विद्यार्थी व तज्ज्ञ अभ्यासकांची चर्चा रंगत असे.

या अभ्यासक्रमाचे फलित म्हणजे जागतिक दर्जाची व उत्कृष्ट कलाकृती म्हणून नावाजले गेलेले चित्रपट तरुण पिढीतील मुलांनी अत्यंत साक्षेपी दृष्टीने पाहून त्यावर आपले मतप्रदर्शन केले. यामुळे त्यांची एक अभिरुची निर्माण करण्यासाठी मदत झाली.

चित्रपट रसास्वाद अभ्यासक्रम विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा सुभाष शिंदे, डॉ प्रियंवदा टोकेकर,जनसंज्ञापन विभागाचे समन्वयक व उपप्राचार्य डॉ महेश पाटील, ग्रंथपाल प्रा नारायण बारसे व विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### स्पेशल सेलविभागातर्फे शिष्यवृत्ती या विषयावर वेबिनार

बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालयाच्या स्पेशल सेल विभागातर्फे शिष्यवृत्ती या विषयावर १२ जानेवारी २०२१ रोजी वेबिनार संपन्न झाले. स्पेशल सेल प्रमुख प्रा. संगीता मेश्राम यांनी शिष्यवृत्ती बाबत सर्वांना मार्गदर्शन केले. कार्यालय वरिष्ठ लिपिक रामचंद्र शिंदे यांनी शिष्यवृत्ती प्रक्रिया सखोलपणे सर्वांना समजावून सांगितली.

### स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ भोसले जयंती

१२ जानेवारी २०२१ रोजी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ भोसले यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयात माहितीचे प्रदर्शन भरवण्यात आले. तसेच त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना यांच्यातर्फे "Swami Vivekananda's message to youth" या विषयावर १२ जानेवारी २०२१ रोजी वेबिनार संपन्न झाले. श्री. मुकेश गायकवाड, विवेकानंद सेंटर फॉर युथ यांनी यावेळी मार्गदर्शन केले. या वेबिनारला ६० विद्यार्थी उपस्थित होते.

### रक्तदान शिबिर

भूदल दिनाचे औचित्य साधून १६ जानेवारी २०२१ रोजी MAH BN NCC युनिट, यांनी टाटा मेमोरियल हॉस्पिटल व रिलीफ आर्मी ऑफिसर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर कोकण भवन, बेलापूर येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी १४० रक्तदात्यांनी रक्तदान केले.



### डॉ. रोहिणी मांढरे

रसायनशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. रोहिणी मांढरे यांना गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्टस सायन्स अँड कॉमर्स गोवा यांच्यातर्फे २१ जानेवारी रोजी ''इन ऑरगॅनिक केमिस्ट्री'' या विषयावर मार्गदर्शन करण्याकरता आमंत्रित करण्यात आले होते.

**नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती**

ग्रंथालय विभागातर्फे २३ जानेवारी२०२१ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना यांच्यातर्फे सुभाषचंद्र बोस यांच्यावरील जीवनपटावर ऑनलाइन प्रश्नमंजुषा तयार करण्यात आली.



**Autonomy : What next?**

२८ जानेवारी २०२१ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या संकुलातील पाणिनी सभागृहात "Autonomy: What next?" या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

स्वायत्त महाविद्यालयाबाबत बोलताना विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी 'नवनवीन गोष्टींची निर्मिती करण्यावर,- जसे संशोधन, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांना अधिक सक्षम बनवणे व याकरता सर्व शिक्षकांनी स्वतः पुढाकार घेऊन नवनवीन गोष्टी सर्वप्रथम स्वतः आत्मसात केल्या पाहिजेत' असे मत त्यांनी मांडले.

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. मोझेस कोलेट यांनी विद्या प्रसारक मंडळ संकुलातच विविध नवनवीन अभ्यासक्रम सुरू करून क्रेडिट ट्रान्स्फर करण्याच्या दृष्टीने कार्य चालू आहे असे सांगितले.

जोशी-बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुभाष शिंदे यांनीदेखील विद्या प्रसारक मंडळ कॅम्पस हे ठाणे शहरातीलच नाही तर मुंबई ठाणे परिसरात शैक्षणिक केंद्र म्हणून घोषित करण्यासाठी आवश्यक ती तयारी करू असा विश्वास दिला.

मुलांमध्ये संशोधन वृत्ती जोपासण्याकरता विविध स्तरावर प्रयत्न केले गेले पाहिजेत असे मत डॉ. सुधाकर आगरकर यांनी मांडले. डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, डायरेक्टर जनरल व डॉ. नीतिन जोशी, संचालक, डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिटय़ूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् यांनी व्यवस्थापन शास्त्रातील गोष्टींचा सुयोग्य वापर करून स्वायत्त संस्था म्हणून कशा प्रकारे कार्यरत राहता येईल याबाबत विविध मुद्यांवर चर्चा केली. वेळ व गती यांची सुयोग्य सांगड घालणे कसे आवश्यक आहे व आपला मुख्य हेतू लक्षात घेऊन व दर्जात्मक काम केल्यावर निश्चितच यश मिळण्यास मदत होते ही बाब निदर्शनास आणून दिली. या कार्यशाळेला ६२ जण उपस्थित होते.

**जयेश दिनकर गोखले याची महाराष्ट्र पोलिस दलामध्ये कॉन्स्टेबल पदासाठी निवड**

जयेश दिनकर गोखले द्वितीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्याची महाराष्ट्र पोलिस दलामध्ये कॉन्स्टेबल पदासाठी निवड झाली. २९ जानेवारी २०२१ पासून त्यांच्या प्रशिक्षणाला सुरुवात झाली.

**कल्पेश चिरमे माजी विद्यार्थी आदर्श कराटे प्रशिक्षक पुरस्काराने सन्मानित**




कल्पेश चिरमे २०१९-२०२० बॅचला व माजी विद्यार्थी याला आदर्श कराटे प्रशिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले.

**डॉ. मैत्रेयी साहा**

वनस्पती शास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. मैत्रेयी साहा यांना ३० जानेवारी २०२१ रोजी रिसर्च एथिक अँड बेस्ट प्रॅक्टिसेस या राज्यस्तरीय परिसंवादा करता प्रमुख वक्त्या म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

**राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथी**

३० जानेवारी २०२१ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.



**अनुबंध माजी विद्यार्थी संघटनेच्या सदस्यांची सहल**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी संघटना अनुबंधचे सदस्य व विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांची सहल विद्या प्रसारक मंडळाच्या कोकण विभागातील वेळणेश्वर संकुल येथे २९ ते ३१ जानेवारी २०२१ या कालावधीत संपन्न झाली. या संपूर्ण सहलीचे नियोजन संतोष मिर्लेकर यांनी अतिशय उत्कृष्टपणे केले. डॉ. विजय बेडेकर सर, प्रा. मोजेस कोलेट, श्री. व सौ. पुराणिक, शितल चाबुकस्वार, प्रा. अभिजीत काळे, सौ. अडसुळे, डॉ. विंदा मांजरमकर, प्रा. सुरेश बापट, सौ. कादंबरी मांजरेकर, संतोष मिर्लेकर, श्री. सुरेश, श्री. रसाळ व श्री. उत्तम जोशी उपस्थित होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**परीक्षा आणि निकाल**

नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा १३ जानेवारी २०२१ रोजी संपल्या. मूल्यांकन प्रगती पथावर आहे. विद्यापीठाच्या सूचनेनुसार सत्र-२ व सत्र-४ चे निकाल २८ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आले.

**अंतर्गत प्रकल्पांची घोषणा**

सत्र-४ च्या विद्यार्थ्यांसाठी अंतर्गत प्रकल्प सूचित केले गेले आहेत.

**स्पर्धा आणि बक्षिसे**

विद्या प्रसारक मंडळाच्या ठा. म. पा. विधी महाविद्यालयाच्या संघाने २५ जानेवारी, २०२१ रोजी के. एल. इ. विधी महाविद्यालय, नवी मुंबई येथील विजेतेपद पटकावले.

वि. प्र. मं. चे ठा. म. पा. विधी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व द्वितीय वर्ष विधीचे विद्यार्थी कु. सोनिया मिश्रा व श्री. हार्दिक झकारिया ह्यांनी केले. त्यांचे अभिनंदन व शुभेच्छा.



ओडिसा आणि शिमलाच्या राष्ट्रीय विधी विद्यापीठांसह संपूर्ण भारतातील २८ संघानी या स्पर्धेत भाग घेतला. आमच्या संघाने प्राथमिक फेरी पार केली आणि अंतिम सामन्यासाठी स्पर्धेत भाग घेणाऱ्या ४ संघापैकी एक बनला. न्यायाधिशांच्या पॅनेलने आमच्या महाविद्यालयाचा संघ विजेता घोषित केला आणि १०,०००/- रोख बक्षीस दिले.

३१ जानेवारी, २०२१ रोजी 'लिगलिटी इंडिया' द्वारा आयोजित वादविवाद स्पर्धेत कु. सोनिया मिश्रा द्वितीय वर्ष विधी हिने द्वितीय पारितोषिक पटकावले.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

"MOE's Innovation Cell" आणि "Institution's Innovation Council (Ministry of Education Initiative) यांच्या संयुक्त विद्यमाने "List of qualified prototypes for Second Stage of Training and evaluation" संकेतस्थळावर प्रकाशित केली.

इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्सच्या "Third Exe for Blind using Arduino and Ultrasonic Sensor" या प्रकल्पाला नामांकन मिळाले.

१५ ते २३ ऑक्टोबर २०२० रोजी "National Intellectual Property Literacy Week" Ministry of Education (Government of India), Ministry of Education's Innovation Cell (Government of India) आणि AICTE यांच्या संयुक्तविद्यमाने हा आठवडा ''कलाम बौद्धिक संपदा शिक्षा एवं जागरुकता अभियान'' म्हणून साजरा करण्यात आला.

डॉ. उषा राघवन, डॉ. सौ. गीताली इंगवले, सौ. अर्चना कालिया हे या एक आठवड्याच्या कार्यक्रमाला Online Platform वर उपस्थित होते. त्यातील "Assessment" यशस्वीपणे उत्तीर्ण झाले. यांना प्रशस्तीपत्रक देण्यात आहे. (२९/१/२०२१)

### विद्युत ऊर्जा शाखा

विद्यार्थ्यांनी मायक्रोसॉफ्ट व नॅसकॉम यांनी आयोजित केलेल्या आर्टीफिशियल इंटलिजन्स या कार्यक्रमात सहभाग घेतला. रोटरी क्लब ऑफ ठाणे आयोजित RYLA या ऑनलाईन कार्यक्रमात आमच्या शाखेच्या विद्यार्थ्यांना RYLA KING व RYLA QUEEN हा किताब मिळाला.

'आत्मनिर्भर भारत अभियाना' अंतर्गत TOYCATHON 2021 ही स्पर्धा आयोजित केली होती. त्यामध्ये तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रीक क्वीझ बोर्ड ही संकल्पना सादर केली.

एमटी स्कील एनहान्समेन्ट इन्स्टिटट्यूट आणि सीएसआय यांनी संयुक्त विद्यमाने घेतलेल्या वेबिनारमध्ये (Google Shides) वरीष्ठ व्याख्याता सौ. राजश्री पाटील व व्याख्याता सौ. कविता अहिरे यांनी भाग घेतला.

'अटल' या एआयसीटीईच्या ॲकेडमी अंतर्गत घेण्यात आलेल्या FDA विषय : इलेक्ट्रीक व्हेईकल यात शाखेच्या वरीष्ठ व्याख्याता सौ. राजश्री पाटील यांनी भाग घेतला.

व्ही.जे.टी.आय.च्या TEQIP अंतर्गत घेण्यात आलेल्या FDA मध्ये शाखाप्रमुख तुषार मोहिते पाटील व वरीष्ठ व्याख्याता सौ. राजश्री पाटील यांनी भाग घेतला.

**इन्फोरमेशन अँड टेक्नॉलॉजी विभाग**

विद्या प्रसारक मंडळाच्या "Institution Innovation Council" IIC या विभागाने १८ जानेवारी २०२१ रोजी "Toycathon", For Idea Submission process हा कार्यक्रम आयोजित केला होता. विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाने साकार केलेल्या विविध संकल्पना आपल्या Board game आणि तंत्रज्ञानाने प्रदर्शित केल्या. या संकल्पनेचा मूळ उद्देश इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंगची संकल्पना, भारतीय संस्कृती व दंतकथा याचे प्रात्यक्षिकीकरण होते. या संकल्पना TOYCATHON 2021 (Ministry of Education's Innovation Cell) मध्ये नोंदविल्या आहेत.

**इन्स्ट्रुमेंन्टेशन विभाग**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ''आत्मनिर्भर भारत अभियान'' या मोहिमे अंतर्गत "Toycathon 2021" ही संकल्पना राबविली होती. विद्यार्थ्यांच्या सृजन मनातल्या वैविध्यपूर्ण तंत्रज्ञानाने परिपूर्ण अशी नावीन्यपूर्ण खेळणी व खेळ ज्यात भारतीय संस्कृती, इतिहास, दंतकथा व नीतीशास्त्र यांचे दर्शन होते. अशा संकल्पना इन्स्ट्रुमेंटेशन विभागाने १९ जानेवारी २०२१ रोजी साकार केली. "Dice for Everyone व Drishti" या दोन्ही संकल्पना विद्यार्थ्यांनी साकार केल्या.

१) सौ. वैशाली जोशी (इन्स्ट्रुमेंन्टेशन विभाग प्रमुख) यांनी २५ जानेवारी ते २९ जानेवारी रोजी AICTE प्रमाणित Online ATAL FDP on "Internet of Things" हा या कार्यक्रमात सहभागी झाले होते. (हा कार्यक्रम कोनगुनाडु कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी, त्रिची इ. तमिळनाडूने आयोजित केला होता.)

२) सौ. स्मिता खंडागळे (व्याख्यात्या इन्स्ट्रुमेंटेशन विभाग)

• AICTE ने आयोजित केलेल्या एक आठवड्याच्या या कार्यक्रमाला (७ डिसेंबर ते १२ डिसेंबर २०२०) ह्यांनी सहभाग घेतला.

• AICTE ने आयोजित केलेल्या एका आठवड्याच्या ATAL FDP on "Design Thinking at our Institute" या विद्यालंकार इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई या कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला.

**इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभाग**

१) डॉ. कीर्ती आगाशे (विभागप्रमुख) यांनी AICTE-ISTE approved FDP कार्यक्रमात "Python Programming" एम.एच साबुसिद्दीक पॉलिटेक्निक मुंबई आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. (१४ डिसेंबर ते १९ डिसेंबर २०२०)

२) AICTE Training and Learning (ATAL) आयोजित "Internet of Thing" श्रीदेवी वुमेन कॉलेज सहआयोजित (हैदराबाद) या कार्यक्रमाला त्यांची उपस्थिती होती. (७ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०२०)

३) सौ. ज्योती झाजी व सुनिल नागरे (व्याख्याते) यांनी ७ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०२० रोजी "ATAL Academy online FDP on "Design Thinking" व विद्यालंकार इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या सहआयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थित होते.

४) डॉ. कीर्ती आगाशे यांची BJP (इंडस्ट्री विभाग, ठाणे जिल्हा) यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**५) प्राध्यापकांचे साहित्य विभागासाठी सहभाग :**

अ) सुनिल नागरे यांचा American Presidential

Election Process Part 1" या विषयावरील लेख दिशा मासिकासाठी प्रकाशित झाला.

ब) "Gulam-e-Mouiki" दिवंगत उस्ताद गुलाम मुस्तफा खान या विषयावरील लेख महाराष्ट्र टाईम्स सामदेव या सदराखाली डॉ. कीर्ती आगाशे यांचा लेख प्रसिद्ध झाला. (२४ जानेवारी २०२१)

• ५ जानेवारी २०२१ "Introduction to vpmthane.org website & Library" या विषयावर संजय सकपाळ, ग्रंथपाल BRIMS यांचे भाषण आयोजित केले होते.

• विभागाने १२ जानेवारी २०२१ AICTE ने आयोजित केलेल्या "Swami Vivekanand Jayanti" ला उपस्थिती दर्शविली.

• प्राध्यापक व इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स विभागाने Microsoft AI Classfoom Series यात नोंदणी केली. हा कार्यक्रम DTE, Microsoft Team, NASSCOM, Futerskills & Bithub यांनी आयोजित केली.

• इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स विभागातील विद्यार्थ्यांनी Toycathon 2021 (Ministry of Educations Innovation Cell) व AICTE यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.

**कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग**

प्राध्यापक व विद्यार्थी वर्गाने १ दिवसीय "Microsoft AI Classroom Series" या कार्यक्रमात सहभाग घेतला.

द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी "Online learning material development activity" चे आयोजन केले. त्यात विविध विषयांच्या व्हिडिओ तयार करण्यात आले.

सौ. गौतमी पुजारे, सौ. मोनाली कोर्डे, सौ. सुजाता गावडे (प्राध्यापक कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग) यांनी AICTE Training and learning (ATAL) Academy मध्ये Online 1 week faculty development program मध्ये सहभाग घेतला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**जानेवारी २०२१ मधील कार्यक्रम / वार्ता**

४ जानेवारी : डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या विभाग प्रमुखांसाठी 'ब्लूम्स टॅक्सोनोमी अँड इट्स अँप्लिकेशन' या विषयावर प्राध्यापक विकास कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यशाळेला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.





८ जाने. : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी विद्यार्थ्यांच्या समवेत ऑनलाईन ब्रीम्स कनेक्ट या मासिक कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी सायकलिंग चॅलेंजमधील सहभागींचे कौतुक करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

ONLINE BRIMS CONNECT CONDUCTED ON 8TH JANUARY 2021




१० जाने. : प्रा. विभूती सावे यांनी रामकृष्ण बजाज राष्ट्रीय गुणवत्ता पुरस्कार (आरबीएनक्यूए) अर्जासाठी तिसऱ्यांदा परीक्षक म्हणून मूल्यांकन केले.



११ – १९ जाने. : डॉ. स्मिता जपे, डॉ. पल्लवी चंदवास्कर, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि वैभव पंडित यांनी उत्कृष्ट व्यवसायिकतेसाठीच्या सीआयआय–एक्झिम बँक पुरस्कारासाठी ईएफक्यूएम प्रारुपावर आधारित सीआयआय मूल्यांकनकर्ता / परीक्षक प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केला.













१२ जाने. : स्वामी विवेकानंद जयंती सोहळा आणि नवीन उपक्रमांची सुरुवात या निमित्ताने ''एआयसीटीई तर्फे आयोजित सायबर सुरक्षा प्रशिक्षण आणि आभासी प्रयोगशाळा'' या विषयावरील वेबिनारला प्रा. संदीप मोघे उपस्थित राहिले.






१५ ते ३० जानेवारी : डॉ. स्मिता जपे आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी ब्रीम्सतर्फे प्रा. क्षितिजा पांडे यांना पीएचडीसाठी संशोधन सल्ला सेवा दिली.

१६ जाने. : सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज तर्फे आंतरमहाविद्यालयीन प्रकल्प स्पर्धेसाठी परीक्षक सदस्य म्हणून डॉ. स्मिता जपे यांना आमंत्रित करण्यात आले.




१८ जाने. : डॉ. पल्लवी चंदवास्कर आणि डॉ. स्मिता जपे यांनी आयोजन समिती सदस्या एम एम एस द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. पूर्वा, कु. सयाली आणि कु. रेवती यांच्या समवेत १८ ते २२ जानेवारी या कालावधीत एम एम एस विद्यार्थ्यांच्या नवीन तुकडीसाठी ''स्टुडंट्स फर्स्ट-केअरिंग फॉर यू टुडे, टुमारो, टुगेदर'' या विषयावर आधारित पायाभूत अभिमुखता कार्यक्रमाचे आयोजन केले आणि त्यात ९० विद्यार्थी उपस्थित राहिले.






| DR VN BRIMS – Online Foundation Programme for MMS (2020-22) 19th -22nd January 2021 | | |
|---|---|---|
| 19th January 2021 | | |
| Timing | Theme | Resource Person |
| 2:00 am - 3:00 am | Innovations in Management Education | Prof. Krunal Punjani |
| 3:00 am – 4:00 am | Role of IT in Business Management | Prof. Sandeep Moghe |
| 20th January 2021 | | |
| 10:00 – 11:00 am | Emerging Trends in Marketing | Dr. Pallavi Chandwaskar |
| 11:00 am – 12:00 noon | Business Communications | Prof. Kanchan Akshay |
| 21st January 2021 | | |
| 10:00 am – 12:00 noon | Ice-breaking session by Placement Committee | MMS Second year placement committee students with Ms. Shweta Nair Madam |
| 22nd January 2021 | | |
| 10:00 am – 11:00 | Nuances in Finance | Dr. Smita Jape |
| 11:00 am - 12:00 noon | E-Learning resources and BRIMS Library orientation | Mr. Sanjay Sapkal |

२५ जाने. : डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी आयक्यूएसीच्या-वतीने एम एम एस विद्यार्थ्यांच्या नवीन तुकडीसाठी एम एम सी ए च्या म्हणजेच (महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर) आणि जुगाड फंडा यांच्या वतीने घेण्यात आलेले प्रशिक्षण सत्र आयोजित केले, ज्यामध्ये ८२ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळाले.







अज्ञानाचा अंधकार जेवढा मोठा आहे, तेवढेच मोठे ज्ञानदीप लावा. सगळे जग हाच तुमचा देश आहे. त्याचे रूप बदलण्यासाठी मनापासून प्रयत्न करा.

२७ जाने. ते १ फेब्रुवारी : डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि प्रा. कृणाल के. पुंजानी यांना जी. एच. रायसोनी इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, नागपूर तर्फे आयोजित ''हाऊ टू राईट रिसर्च पेपर इन स्कोपस जर्नल'' या विषययावरील ५ दिवसांच्या प्राध्यापक विकास कार्यक्रमासाठी व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात आले.




२७ जाने.: आयआयसी आणि आयक्यूएसीच्यावतीने डॉ स्मिता जपे यांनी, विद्यार्थ्यांनी कारकीर्दीची योग्य दिशा ठरविण्यासाठी – 'तुम्ही भविष्यासाठी तयार आहात काय?' विषयावर समीर आपटे यांच्या अतिथी सत्राचे आयोजन केले.

३० जाने. : एम एम एसच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयसीआय आणि आयक्यूएसी समिती तर्फे डॉ. स्मिता जपे यांनी टेडेक्सचे व्याख्याते अविरत शेटे यांच्या ''स्टॉप एक्सिस्टिंग स्टार्ट लिविंग'' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन केले.

३० जाने. : प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी राष्ट्रीय नवसंकल्पना आणि नवउद्यमी धोरण यावर ऑनलाईन अभिमुखता सत्राचे आयोजन केले.

३० जाने. : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. कंचन अक्षय आणि दीपाली हिंदळेकर यांनी 'स्वरांजली' कार्यक्रमाचे दूरस्थ माध्यमाच्या सहाय्याने आयोजन केले. दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील ब्रीम्सचे शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

पी.जी.डी.एम.ची विद्यार्थिनी हर्षना हिने – राग बसंत, एम.एम.एस.चा विद्यार्थी अवधूत याने तबला वादन, प्राध्यापिका डॉ स्मिता जपे यांनी गायन, प्रा. महेश भानुशाली यांनी संवादिनी वादन आणि गायन तसेच माऊथ ऑर्गन वादन , एम.एम.एस.ची विद्यार्थीनी प्रशंसा हिने गायन, प्रा. सिद्धेश सोमण यांनी 'यूकेलेले' (एक चारतारी छोटे तंतुवाद्य) वादन , संचालक डॉ. नीतिन जोशी यांनी गझल गायन, एम.एम.एस.चा विद्यार्थी साई पवन याने गायन आणि एम.एम.एस.चा विद्यार्थी तन्मय याने देखील गायन सादर केले. तसेच प्रा. विभूती सावे आणि केतकी यांनी काव्यमय सूत्रसंचालनाद्वारे कार्यक्रमाचे यशस्वी सादरीकरण केले.




आतापर्यंत 'यू ट्यूब' या प्रसारमाध्यमांवर प्रसारित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला ४०० हून अधिक दर्शक मिळाले आहेत.

३० आणि ३१ जानेवारी : डॉ. श्रीधरन मेनन, प्रा. कंचन अक्षय आणि प्रा. संदीप मोघे यांनी युडेमी तर्फे आयोजित ''बी अ ग्रेट मेंन्टर : अ प्रॅक्टिकल गाइड टू मेन्टोरशिप'' हा ऑनलाईन अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.










'ध्येय' या व्यवसाय मार्गदर्शन आणि नियोजन संस्थेतर्फे डॉ. नीतिन जोशी यांना युवकांचे मार्गदर्शन केल्या बद्दल स्वामी विवेकानंद बिल्ला ( बॅज) देऊन सन्मानित करण्यात आले.




''बदलत्या जागतिक परिस्थितीत व्यवसाय रणनीती, उद्योजकीय आव्हाने आणि सामाजिक मूल्ये यांचा पुनर्विचार'' या विषयावरील १५ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सादर केलेल्या डॉ. नीतिन जोशी यांच्या, ''मुंबईतील खाजगी जीवन विमा कंपन्यांच्या सेवा गुणवत्तेविषयी जनरेशन एक्स आणि जनरेशन वाय ग्राहकांच्या अपेक्षांचा अभ्यास'' या शोध निबंधाला उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार मिळाला.




डॉ. नीतिन जोशी यांची के जी. जोशी कला महाविद्यालयातर्फे त्यांच्या बी. व्होक. या पदवी अभ्यासक्रमासाठी विक्री व विपणन क्षेत्राचे शैक्षणिक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

डॉ. नीतिन जोशी यांनी व्हीईएस चेंबूरच्या विद्यार्थ्यांसाठी ''तुमच्यातले नेतृत्व गुण शोधा'' या विषयावर व्याख्यान दिले.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे डॉ. नीतिन जोशी यांना इंटर-डिसिप्लिनरी सायन्सच्या अभ्यास मंडळावर विषय तज्ज्ञ म्हणून निमंत्रित करण्यात आले.

डॉ. श्रीधरन मेनन यांची स्कोपस अनुक्रमित ''द क्वार्टरली रिव्ह्यू ऑफ इकॉनॉमिक्स अँड फिनान्स'' या नियतकालिका-साठी समीक्षक (Reviewer) म्हणून नेमणूक झाली.



(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

दूरवर जात असल्याने ज्ञानदाता कुठेही असला तरी चालतो. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यासाठी लिहिता–वाचता येण्याची गरज नाही. केवळ कानावर पडणाऱ्या शब्दांवर लक्ष केंद्रित केले की झाले. दूरस्थ शिक्षणाचे रेडिओ एक प्रभावी माध्यम होते. पोलिओ सारख्या साथींमध्ये जेव्हा शाळा भरविणे शक्य नव्हते तेव्हा शिक्षणासाठी रेडिओचीच मदत घेतली जात असे. रेडिओने समाज जागृतीचे मोठे काम केले आहे. भारतातून निसटून विदेशात गेलेल्या सुभाषचंद्र बोस यांनी रेडिओ ह्या माध्यमातून देशबांधवांशी संपर्क साधला होता.

जगाच्या वेगवेगळ्या भागांत वेगवेगळ्या घटना घडत असतात. या घटनांची माहिती जगभर कमीतकमी वेळात पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य रेडिओने केले आहे. आमच्या कॉलेजच्या दिवसांमध्ये आम्ही क्रिकेट कसोटीचं धावते समालोचन रेडिओवर ऐकत असू. केवळ शब्दांचा वापर करून समालोचक आपल्यापुढे प्रत्यक्ष चित्र निर्माण करीत असत. त्यांनी केलेल्या वर्णनावरून लंडनमधील लॉर्ड, जमैका मधील किंग्सटन आणि ऑस्ट्रेलियातील मेलबोर्न क्रिकेट ग्राउंड या मैदानांची चित्रे माझ्या मनात निर्माण झाली होती. प्रत्यक्ष जेव्हा मी या ठिकाणांना भेटी दिल्या तेव्हा माझ्या मनातील चित्रं प्रत्यक्ष जुळतात असाच मला अनुभव आला.

युद्धकाळातील संदेश वहन, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी लागणाऱ्या मदतीचे आवाहन, शेतीसाठी पाहिजे असलेला हवामानाचा अंदाज अशा अनेक बाबतींत रेडिओने मोलाची कामगिरी केली आहे. टेलिव्हिजनच्या आगमनाने रेडिओ संच जरा मागे पडले. तरीही रेडिओने आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. आजही अनेक लोक नियमितपणे रेडिओचे कार्यक्रम ऐकतात. टेलिव्हिजनचे कार्यक्रम पाहायला एका ठिकाणी खिळून बसावे लागते. याऐवजी आपली कामे करता करता रेडिओचे कार्यक्रम ऐकता येतात. प्रवासात सिनेसंगीत ऐकायचे असेल, शेतात काम करताना बातम्या ऐकायच्या असतील तर किंवा घरकाम करताना भजने ऐकायची असतील तर रेडिओसारखे माध्यम नाही. म्हणूनच लोकांशी संवाद साधण्यासाठी भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'मन की बात' या कार्यक्रमासाठी रेडिओ हेच माध्यम निवडले आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

---

(पृष्ठ क्र. १५ वरून - **सत्येंद्रनाथ बोस : पुंज भौतिकीचे जनक**)

'बोसॉन' हे नाव कणास दे त्या, एस्राज जो उत्तम वाजवी त्या ।

सैद्धांतिकाला मनि स्थान द्यावे, सत्येंद्रनाथा तुज आठवावे ।। १ ।।

लोकांत विज्ञान रुजो म्हणूनी, बंगीय विज्ञान परीषदेला । स्थापून सत्कार्य पुरे करे त्या, सत्येंद्रनाथा तुज आठवावे ।। २ ।।

**संदर्भ**

१. सत्येंद्रनाथ बोसः पुंज भौतिकीचे जनक https://vigyanprasar.gov.in/bose-satyendra-nath/

२. सत्येंद्रनाथ बोसः राष्ट्रीय चरित्र, शांतीमय आणि एनाक्षी चटर्जी, १९९९, किंमतः रु.९०/–, पृ.१२१ https://www.nbtindia.gov.in/books_detail_9_national-biography_2207_satyendra-nath-bose.nbt

३. सत्येंद्रनाथ बोस https://www.famousscientists.org/s-n-bose/

**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.